सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. ३१ जुलै २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ११९ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



**छत्रपती संभाजीनगर** – पांडे आयर्न अ‍ॅण्ड ट्रेडींग कं., शहा स्टील ट्रेडर्स, रॉयल ट्रेडर्स, वाय.के.ट्रेडर्स, **नारेगाव** – एन.के.ट्रेडर्स, **हर्सुल** – सुरेश ट्रेडर्स अँड हार्डवेअर, **बेरीबाग** – सारा ट्रेडर्स, **सावंगी** – अंजनी ट्रेडर्स, **पिसादेवी** – देवदत्त ट्रेडर्स, **शेंद्रा एमआयडीसी** – निशांत ट्रेडर्स, **करमाड** – साई बिल्डींग मटेरिअल अ‍ॅण्ड सप्लायर्स, **आडुळ** – शिवकृपा ट्रेडर्स, **वाळुजगाव** – चंद्रपुष्प इंटरप्राईजेस, **पडेगाव** – कमलेश ट्रेडींग कं, **वैजापूर** – राजाराम स्टील ट्रेडर्स, **लोणी**– बाबा ट्रेडर्स, **देवगाव रंगारी** – मराठवाडा ट्रेडर्स, **खंडाळा** – रविराज अ‍ॅग्रो एजन्सीज, **गंगापूर** – हरिओम ट्रेडर्स, **लासूर स्टेशन** – साई ट्रेडिंग कंपनी (मढीकर), **लिंबेजळगाव** – श्री.विठ्ठल कृपा ट्रेडर्स, **महालगाव** – महालक्ष्मी स्टील ट्रेडर्स, **शिऊर बंगला** – जलाल ट्रेडर्स, **पैठण** – संजय ट्रेडर्स, **बिडकीन** – मानधने स्टील ट्रेडर्स, **वासडी** – संतोष ट्रेडर्स, **पिशोर** – रेणुका ट्रेडर्स, **सिल्लोड** – सहारा ट्रेडर्स, **गोळेगाव** – सागर ट्रेडर्स, **उंडणगाव** – श्री.गणेश ट्रेडर्स, **अंधारी** – विशाल ट्रेडर्स, **आळंद** – गजानन ट्रेडर्स, **फुलंब्री** – गजानन ट्रेडर्स, शिव ट्रेडर्स, **पाल फाटा** – योगराज ट्रेडींग कंपनी, श्री.जगदंबा स्टील ट्रेडर्स, **बोरगाव गणपती** – संजय हार्डवेअर, **सुलतानपूर** – लक्ष्मी मशिनरी स्टोअर्स, **कन्नड** – मोरया ट्रेडर्स, **विहामांडवा** – वर्धमान हार्डवेअर अँण्ड मशिनरी, **शिऊर** – विठ्ठल ट्रेडर्स, **औराळा** – बालाजी ट्रेडर्स, **पाणपोईफाटा** – भगवती स्टील, **पाचोड** – श्रीनाथ ट्रेडर्स अ‍ॅण्ड हार्डवेअर, **चितेगाव** – दुर्गा स्टील ट्रेडर्स.

आयकॉन स्टील
टीएमटी बार

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम : मंत्री लोढा

मुंबई: केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या प्रशिक्षण महासंचालक यांनी राज्यातील ७० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आय.टी.आय.) नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता दिली आहे. तसेच चेंबूर येथे शासकीय उच्चस्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापनेसाठी मान्यता देण्यात आली आहे. काळानुरूप बदलत्या अभ्यासक्रमामुळे रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होवून यामुळे महाराष्ट्रातील आय.टी.आय मध्ये क्रांती घडणार आहे, असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील ७० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिक), ईव्ही मेकॅनिक (इलेक्ट्रिक व्हेईकल) हे नवीन अभ्यासक्रम शिकविण्यात येणार आहेत. पर्यावरण संवर्धनावर आधारित योजना राबविण्यार राज्य शासनाचा भर असून राज्यात सौर ऊर्जाशी निगडीत तंत्रज्ञानांची व सोलर टेक्निशियन तसेच मेकॅनिक इलेक्ट्रिक व्हेईकलची गरज लक्षात घेवून या क्षेत्रातील टेक्निशियन मागणी वाढणार आहे. त्यानुषंगाने दोन नवीन अभ्यासक्रमाची मागणी व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाने केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या प्रशिक्षण महासंचालक यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य विकास विभाग नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर आणि मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या सूचना व सल्ल्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये काळानुरूप अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. सध्या राज्यातील ७० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये हा अभ्यासक्रम शिकविण्यात येणार आहे. ज्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रमांची मागणी करतील त्यांना मंजूरी देण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, असेही मंत्री लोढा यांनी सांगितले. केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या प्रशिक्षण महासंचालक यांनी अनसूचित जातीतील व नवबौध्द घटकातील प्रशिक्षणार्थ्यींचे सामाजिक सक्षमीकरण व उन्नतीसाठी चेंबूर येथे शासकीय उच्चस्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापनेसाठी मान्यता देण्यात दिली आहे.

# रशियातील कामचटका येथे ८.७ तीव्रतेचा शक्तीशाली भूकंप

## अमेरिका, जपानपर्यंत त्सुनामीचा इशारा जारी

मॉस्को, ३० जुलै (हिं.स.)।रशियाच्या कामचटका द्वीपकल्पात आज, बुधवारी सकाळी ८.७ तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला. या भूकंपाचे केंद्र पॅसिफिक समुद्राखाली असल्याने पूर्वेकडील कुरील आयलंडवर त्सुनामी आली आहे. त्यानंतर प्रशांत महासागरात त्सुनामीचा इशारा देण्यात आला.

यूएस जिओलॉजिकल सर्व्हे नुसार, रशियन समुद्राखाली ८.७ एवढ्या रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला आहे. त्यानंतर जपान आणि अमेरिकेच्या एजन्सींनी त्सुनामी अलर्ट (त्सुनामी वॉच) जारी केला आहे. या भूकंपाचे हादरे पॅसिफिक समुद्रकिनाऱ्यांच्या रिंग म्हणजेच पार अगदी अमेरिकेपर्यंत बसले आहेत. भूकंपानंतर कामचटकाच्या किनारी भागात सुमारे ४ मीटर उंचीच्या त्सुनामी लाटा उठल्या.रशियातील





कामचटका येथे पहाटे भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. रशियाच्या किनाऱ्यावर तसेच अमेरिकेतील कॅलिफोर्नियामध्ये, जपान येथे त्सुनामीचा इशारा देण्यात आला आहे. स्थानिक प्रशासनाने आपत्ती निवारण आणि बचाव कार्य सुरू केले आहे.

अमेरिकन सामोआ, अंटार्क्टिका, कोलंबिया, कुक बेटे, कोस्टा रिका, एल साल्वाडोर, फिजी, गुआम, ग्वाटेमाला, हॉलंड आणि बेकर, इंडोनेशिया, जार्विस बेट, कार्माडिस बेट, किरिबाटी, मार्शल बेटे, मेक्सिको, मिडवे बेट, न्यूझीलंड, निकाराग्वा, पलाऊ, पालमायरा बेट, पनामा, पापुआ न्यू गिनी, पेरू, फिलीपिन्स, सामोआ, तैवान, टोंगा आणि वानुआतु या देशांना त्सुनामीचा तडाखा बसू शकतो असा इशारा देण्यात आला आहे.

भूकंप आणि त्सुनामीच्या धोक्यानंतर, रशियाच्या सखालिन प्रदेशातील सेवेरो-कुरिलस्क या छोट्या शहरातून लोकांना बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांना परिस्थितीची माहिती देण्यात आली आहे आणि सरकारने आपत्कालीन बैठक बोलावली आहे आणि मदत आणि बचाव कार्याची तयारी सुरू केली आहे. पुढील तीन तासांत रशिया आणि जपानच्या काही भागात धोकादायक त्सुनामी लाटा पोहोचू शकतात, असा इशारा अमेरिकेने दिला आहे. तसेच समुद्र किनाऱ्यावरील लोकांना सुरक्षित स्थळी जाण्यास सांगण्यात आले आहे. जपानच्या स्थानिक मीडिया रिपोर्टनुसार, देशाच्या पूर्व किनाऱ्याजवळ एक फूट उंचीच्या पहिल्या त्सुनामी लाटा आल्या आहेत. यानंतर जपानने २० लाख लोकांना बाहेर काढले आहे आणि त्यांना सुरक्षित ठिकाणी नेले आहे. याशिवाय, त्यांच्या फुकुशिमा अणुभट्टीतील लोकांना बाहेर काढण्यात आले आहे.

## पावसामुळे अमरनाथ यात्रा तात्पुरती स्थगित



जम्मू, ३० जुलै : मुसळधार पावसामुळे अमरनाथ यात्रेत पुन्हा एकदा व्यत्यय आला आहे. प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून पहलगाम आणि बालटाल या दोन्ही मार्गावर बुधवारपासून बंदी घातली आहे. जम्मू-काश्मीर माहिती व जनसंपर्क विभागाच्या (डीआयपीआर) ट्विटर (एक्स) हँडलवर याबाबत घोषणा करण्यात आली आहे. जम्मू विभागाचे विभागीय आयुक्त रमेश कुमार यांनी सांगितले की, ३१ जुलै रोजी भगवतीनगर, जम्मू येथून बालटाल आणि नुनवान या आधार छावण्यांकडे कोणताही भाविक काफिला पाठवण्यात येणार नाही. संततधार पाऊस आणि त्यातून निर्माण होणारी भूस्खलनाची व इतर आपत्तींची शक्यता लक्षात घऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. काश्मीर विभागाचे आयुक्त विजय कुमार बिधुरी म्हणाले की, बुधवार (३० जुलै) सकाळपासूनच पाऊस सुरू आहे, त्यामुळे बालटाल आणि चंदनवाडी मार्गांवर भाविकांना पुढे जाण्याची परवानगी देण्यात आलेली नाही. यात्रा यावर्षी ३ जुलैला सुरू झाली असून, ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन दिवशी समाप्त होणार आहे. यावर्षी आतापर्यंत जवळपास ४ लाखांहून अधिक भाविकांनी अमरनाथ गुहेचे दर्शन घेतले आहे. यापूर्वी देखील १७ जुलै रोजी खराब हवामानामुळे यात्रा थांबवण्यात आली होती.पावसामुळे रस्ते आणि ट्रॅक स्लिप होण्याचा धोका असल्याने भाविकांनी प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. पुढील निर्णय हवामानाच्या स्थितीनुसार घेतले जातील. भाविकांना वेळोवेळी प्रशासनाकडून अद्ययावत माहिती देण्यात येणार आहे.

# दया नायक यांना निवृत्तीपूर्वी एसीपी पदावर बढती

मुंबई, ३० जुलै : मुंबई पोलिस दलातील एन्काऊंटर स्पेशलिस्ट पोलीस निरीक्षक दयानंद (दया) नायक यांना निवृत्तीच्या अगोदरच सहाय्यक पोलीस आयुक्त (एसीपी) पदावर बढती देण्यात आली आहे. गृहविभागाने मंगळवारी नायक यांच्यासह आणखी तीन वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या बढतीचे आदेश जारी केले. दया नायक ३१ जुलै रोजी ३१ वर्षांची सेवा पूर्ण करून निवृत्त होत आहेत.

गृहविभागाने जारी केलेल्या आदेशानुसार दया नायक यांच्यासह जीवन खरात, दीपक दळवी (मुंबई) आणि पांडुरंग पवार (जळगाव) यांना एसीपी पदावर बढती देण्यात आली आहे. मुंबईतील नायक, खरात आणि दळवी यांची बदली मुंबई शहरात करण्यात आली असून जळगावचे पांडुरंग पवार यांची बदली जळगावच्या आर्थिक गुन्हे शाखेत झाली आहे.दया नायक यांनी आपल्या कारकिर्दीत तब्बल



८६ एन्काउंटर केले असून त्यात दाऊद टोळीतील २२, राजन टोळीतील २० गुंडांचा समावेश आहे. तसेच लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलम (एलटीटीई), लष्कर-ए-तैय्यबा सारख्या दहशतवादी संघटनांशी संबंधित अनेकांना त्यांनी ठार केले. कुख्यात कंधार विमान अपहरण प्रकरणात सहभागी असलेल्या पाच दहशतवाद्यांपैकी तीन जणांना नायक यांनी चकमकीत ठार केले होते.

१९९० च्या दशकात अंडरवर्ल्डच्या वाढत्या दहशतीला आळा घालण्यासाठी नायक यांनी मोठी भूमिका बजावली होती. १९९५ मधील काळ्या दिवाळीनंतर त्यांनी १९ गुंडांचा एन्काउंटर करून टोळी युद्धात गुंतलेल्या गुंडांना प्रत्युत्तर दिले होते. १९९८ मध्ये मुंबई पोलिसांनी जाहीर केलेल्या टॉप-टेन गुंडांच्या यादीतील सात जणांना नायक यांनी चकमकीत संपवले होते.

एन्काउंटरशिवाय त्यांनी शेकडो महत्त्वाच्या तपासात सहभाग नोंदवला. २००२ आणि २००३ मधील मुंबईतील रेल्वे बॉम्बस्फोट प्रकरणात सिमी संघटनेच्या सदस्य साकिब नाचनला अटक करण्यामध्येही नायक यांचा महत्त्वपूर्ण वाटा होता. आपल्या सेवेत त्यांनी एक हजाराहून अधिक आरोपींना अटक केली आहे.

निवृत्तीच्या फक्त तीन दिवस आधी मिळालेल्या या बढतीबद्दल दया नायक यांनी आनंद व्यक्त केला. ३१ जुलै रोजी ते अधिकृतपणे पोलिस दलातून निवृत्त होणार आहेत.

## ट्रम्प भारतावर भडकले, घेतला टोकाचा निर्णय

वॉशिंग्टन डी. सी. : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के आयातशुल्क (कर) अर्थात टॅरिफ लादण्याची घोषणा केली आहे. ट्रम्प यांचा हा निर्णय १ ऑगस्टपासून लागू होईल. ट्रम्प यांनी ट्रूथ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ही माहिती दिली आहे. अमेरिका १ ऑगस्टपासून भारतातून आयात होणाऱ्या उत्पादनांवर अतिरिक्त आयातशुल्क (कर) अर्थात टॅरिफ लादणार आहे. रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर दंड लावण्याची घोषणाही ट्रम्प यांनी केली आहे. जगातील कोणत्याही देशापेक्षा भारतात सर्वात कठीण व्यापार अडथळे आहेत; असेही ट्रम्प यांनी ट्रूथ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मतप्रदर्शन केले आहे.

## सिल्लोड सोयगावात पोलीस पाटलांची लवकरच भरती

छत्रपती संभाजीनगर, ३० जुलै : छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील सिल्लोड सोयगाव तालुक्यातील रिक्त असलेल्या ८३ गावांच्या पोलीस पाटील पदासाठी भरतीची प्रक्रिया लवकरच सुरू होणार असल्याची माहिती महसूल प्रशासनाकडून मिळाली आहे.

# सप्टेंबर २०२५ पर्यंत ५००० मेगावॅटचे प्रकल्प पूर्ण करा - मुख्यमंत्री

मुंबई, ३० जुलै : मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही माझी महत्वाकांक्षी योजना आहे. सप्टेंबर २०२५ पर्यंत ५००० मेगावॅटचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी योजनेतील कामांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई होता कामा नये.या योजनेचे राज्यातील सर्व कार्यान्वयिन यंत्रणांनी कामे गतीने व कालबध्द नियोजन करून करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० साठी जमीन उपलब्धता आणि इतर आनुषंगिक विषयांसंदर्भात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव ऊर्जा आभा शुक्ला उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही योजना माझी अत्यंत महत्वाकांक्षी योजना आहे. खासगी आणि शासकीय जागेत विकसित होणा-या सौर प्रकल्पासाठी स्थानिक यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. जिल्हास्तरीय टास्क फोर्सने या योजनेच्या वेळोवेळी होणा-या कामांच्या सद्यस्थितीचा आढावा घ्यावा.कामे करण्यासाठी ना-हरकत दाखले,विकासकांना येणा-या अडचणी प्राधान्याने सोडवाव्यात. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेतून सप्टेंबर २०२५ पर्यंत पाच हजार मेगावॅटपर्यंत वीज उपलब्ध होईल याप्रकारे जिल्हानिहाय कामांना गती देण्यात यावी असे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, पर्यायी जमिनींचा भाडेपट्टा देणे,पिक अतिक्रमण हटविणे,कायमस्वरूपी रचनांचे अतिक्रमण काढणे, रस्ता पुन्हा तयार करणे आणि आवश्यकतेनुसार जमिनीचे वेळेवर मोजमाप व सीमांकन करणे तसेच ग्रामपंचायतींना ना हरकत दाखले देणे ही कामे जिल्हाधिकारी यांनी प्राधान्याने करावीत. सौर प्रकल्पाच्या साहित्याची चोरी झाल्यास पोलीसांनी तात्काळ कायदेशीर कारवाई करावी. दाट लोकवस्ती असलेल्या भागात योजनेचे काम करताना योग्य ती काळजी घेण्यात यावी. झाडांसंदर्भात मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे, वीज वाहिनी वन क्षेत्रातून जात असल्यास वन विभागाकडून परवनगी लवकरात लवकर देण्यात यावी. खासगी तसेच लगतच्या वन क्षेत्रासाठी नाहरकत परवानग्या विहित वेळेत देण्याची कार्यवाही वन विभागाने करावी असे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले.

यावेळी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, ग्रामविकास विभागाचे एकनाथ डवले, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक डॉ संजीव कुमार, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ राधाकृष्णन बी.महाऊर्जा विकास संस्थेचे महासंचालक ओमप्रकाश बकोरिया व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## घृष्णेश्वर मंदिरात व्हीआयपी दर्शनासाठी पैसे आकारल्यास थेट फौजदारी गुन्हा

### पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड

छत्रपती संभाजीनगर, ३० जुलै : बारावे ज्योतिर्लिंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री घृष्णेश्वर वेरूळ मंदिरात व्हीआयपी दर्शनासाठी कोणी पैसे मागत असेल तर थेट पोलिसांशी संपर्क करावा संबंधिताविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, तसेच फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील असे छत्रपती संभाजी नगर येथील ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी स्पष्ट केले आहे

श्री घृष्णेश्वर मंदिरात श्रावण महिन्यात प्रचंड गर्दी आहे. या पार्श्वभूमीवर भाविकांची मोठी गर्दी देखील आहे घृष्णेश्वर मंदिरात दर्शनासाठी कधीही कोणी पैसे आकारले जात नाही. त्यामुळे भक्तांना कोणीही दर्शनाच्या नावाखाली पैसे मागेच असेल, तर त्यांनी थेट पोलिसांशी संपर्क करावा असा ११२ या क्रमांकावर संपर्क करावा, असेही राठोड यांनी सांगितले आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये भक्तांची फसवणूक होऊ दिली जाणार नाही. नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन देखील डॉ. राठोड यांनी केले आहे.

मंदिरात होत असलेल्या गरजेचा फायदा घेऊन काहीजण व्हीआयपी दर्शन देतो, असे सांगून पैसे मागत आहेत यावर पोलिसांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

## करंजखेड जि.प.शाळेत इयत्ता पाचवीसाठी मान्यता देणार : जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.३० जुलै - करंजखेड येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत असल्याने खाजगी शाळांमधून विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेत दाखल होत आहेत. मात्र, इयत्ता पाचवीसाठी अद्यापही शासनमान्यता मिळालेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देत तात्काळ मान्यता देण्याची मागणी केली होती. यावर जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत पाचवीच्या वर्गाला मान्यता देण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

सन २०१९ मध्ये या शाळेत केवळ पहिली ते चौथी इयत्तांमध्ये एकूण सात विद्यार्थी होते. मात्र, दर्जेदार शिक्षणामुळे पालकांचा विश्वास



पुन्हा जिल्हा परिषद शाळांवर बसत असून २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिली ते पाचवीसाठी १२० ते १२५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये पाचवीसाठीही २० विद्यार्थी असूनही अद्याप मान्यता मिळालेली नव्हती.

शाळा व्यवस्थापन समितीचा प्रस्ताव, ग्रामपंचायतीचा ठराव, विद्यार्थी पालकांची सहमती पत्रे वेळोवेळी पाठवूनही मान्यता मिळत नसल्यामुळे संताप व्यक्त होत होता. विशेष म्हणजे, करंजखेड येथील ही जिल्हा परिषद शाळा १९५० पासून कार्यरत आहे. पूर्वी शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत वर्ग सुरू होते आणि एकूण विद्यार्थी संख्या ७०० पेक्षा अधिक होती. मात्र, विद्यार्थ्यांची संख्या घटल्याने काही वर्षांपूर्वी पाचवी ते सातवी वर्ग बंद करण्यात आले होते. आता पुन्हा एकदा विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने या वर्गांना मान्यता देण्याची गरज निर्माण झाली आहे. करंजखेड हे अंदाजे सुमारे २५ हजार लोकसंख्येचे मोठे गाव असून २०११ च्या जनगणनेनुसारही येथे ११ हजारांहून अधिक लोकसंख्या नोंदवली आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि पालकांचा विश्वास पाहता शाळेस इयत्ता पाचवीसाठी तातडीने मान्यता द्यावी, अशी मागणी ग्रामस्थ व पालकांनी केली होती.

दि. ३० रोजी जिल्हाधिकारी कन्नड येथे आले असता ग्रामस्थांनी त्यांना हे निवेदन सादर केले. या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत जिल्हाधिकारी यांनी पाचवीच्या वर्गाला लवकरच मान्यता दिली जाईल, अशी ग्वाही दिली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे

दुषित पाण्यामुळे लिवर चे होणारे त्रास..

लिवर चे कार्य अनियमीत राहल्याने उत्पन्न होणारे त्रास – भूक न लागणे, लघवी पिवळया रंगाची होणे, गॅस्ट्रो नंतर येणारा थकवा, पाचनशक्तिची कमजोरी, अन्नाचे पाचन ठीक न होणे इत्यादी त्रास दूर करण्यात उपयोगी.




बैद्यनाथ नागपूर असली आयुर्वेद
कुमार्यामृत
अ‍ॅलोयुक्त लिव्हर टॉनिक
(कुमारी आसव)
निरोगी लिवरसह जगा आनंदी आयुष्य
वैद्यकीय सल्ला : 844 844 4935 www.baidyanath.co

# खा.डॉ.कल्याण काळे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी नियुक्ती

## जालना-छत्रपती संभाजीनगर लोकसभेचे खासदार म्हणून कार्यरत असलेले लोकप्रिय नेते डॉ. काळे यांची प्रदेश स्तरावर मोठी जबाबदारी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना-छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार डॉ. कल्याण वैजिनाथराव काळे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत होत असून, विविध स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

डॉ. काळे यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, स्पष्ट विचार-सरणी आणि जनतेशी असलेल्या दृढ नात्याला ही नियुक्ती म्हणजे काँग्रेस पक्षाची अधिकृत मान्यता असल्याचे म्हटले जात आहे. राजकीय क्षेत्रात डॉ. काळे यांचा प्रदीर्घ आणि समृद्ध असा कार्यानुभव आहे. पंचायत समिती संभाजीनगरचे उपसभापती, देवगिरी सहकारी साखर कारखान्याचे संचालक, तसेच औरंगाबाद पूर्व व फुलंब्री या दोन विधानसभा मतदारसंघांतून एकवेळ आमदार अशी लोकप्रतिनिधीची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांनी युवाशक्तीला दिशा दिली असून, २०२० पासून ते औरंगाबाद जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणूनही जबाबदारी सांभाळत आहेत. प्रदेश काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविल्यामुळे काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी ते महत्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.



## ≫ आ.बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नांना यश

# मंठा शहरालगत असणारा राष्ट्रीय महामार्ग होणार प्रकाशमय



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा शहरालगत असलेल्या राष्ट्रीय महामार्गांवरील पथदिव्यांचा प्रश्न बरीच वर्षांपासून एरणीवर होता या महामार्गांवरील दळणवळण करणाऱ्या अनेक वाहनांचे अपघात होऊन तब्बल ६० च्या वर निष्पाप नागरिकांचे पथदिवे बंद असल्याने अपघातात बळी गेले आहेत हाच मुद्दा लक्षात घेऊन मंठा नगरपंचायत नगराध्यक्ष ,उपन-गराध्यक्ष , सहकारी नगरसेवक यांनी जनतेच्या वतीने माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनरावजी लोणीकर साहेबांची भेट घेऊन संबंधित प्रश्न मांडला तसेच आज पथदिवे कार्यन्वीत करण्यासाठी डी. पी मंठा शहरात दाखल झाल्या असून पूजन करताना नगराध्यक्ष वैजनाथ नाना बोराडे, उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे यावेळी नगरसेवक दीपक बोराडे, नगरसेवक एन. डी दवणे, नगरसेवक उबेद बागवान , ड्राइव्हर युनियनचे सर्व सदस्य पदाधिकारी तसेच शहरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# संक्षिप्त

## वैष्णवी डोईफोडेच्या दोन कवितेची आंतरराष्ट्रीय संकलन पुस्तकात निवड



**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राज-राम डोईफोडे यांची कन्या वैष्णवी राजाराम डोईफोडे हिच्या दोन हिंदी कवितेची निवड आंतरराष्ट्रीय संकलन पुस्तक व्हिस्पर्स बेनिथ नाईट स्काय वर्सेस अंडर द स्टार इज नाईट या मध्ये निवड झाली आहे या पुस्तकाचे प्रकाशन थॉट्स हिमन पब्लिसर्स मार्फत करण्यात आले असून त्यांच्या प्रकाशनाचा हा पाचवा खंड आहे तिच्या मन का साथी व होस्टेल डायरी केआखरी पन्ने या दोन हिंदी कवितेची निवड झाली आहे. वैष्णवी सध्या छत्रपती संभाजी नगर येथे अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असून ती राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक केंद्रामध्ये सुद्धा शिक्षण घेत आहे तिच्या या काव्य निवडीबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव प्रो.डॉ.सुखदेव मांटे ,अध्यक्ष रेवती मांटे, कार्यालयीन अधीक्षक किशोर वाघ, उप प्राचार्य अमोल बांडगे, प्रा. अनिल मगर यांनी विशेष अभिनंदन केले आहे तसेच तिच्या पुढील काव्य वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.तिचा काव्यसंग्रह लवकरच प्रकाशित होण्याच्या वाटेवर असल्याची माहिती प्राचार्य डॉ.राजाराम डोईफोडे यांनी दिली.

## अंबड घनसावंगी शिक्षक पतसंस्थेच्या सचिवपदी उद्धव बिल्हारे



**तभा वृत्तसेवा**
**अंबड प्रतिनिधी**

अंबड-घनसावंगी तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या सचिवपदी उद्धव बिल्हारे यांची बहूमताने निवड करण्यात आली . त्याबदल त्यांचे सर्वशिक्षक व मित्रपरिवाराकडून अभिनंदन करण्यात येत आहे .

अंबड घनसावंगी तालुक्यातील प्राथमिक शिक्षक यांची सहकारी पतसंस्था अंबड येथे कार्यरत आहे . दोन्ही तालुक्यात सहकारी क्षेत्रामध्ये ही संस्था अग्रगण्य मानली जाते उद्धव बिल्हारे यांच्या शैक्षणिक कार्याची नोंद घेऊन सर्व संचालक मंडळाने त्यांची सचिवपदी निवड केली .

या प्रसंगी पतसंस्थेचे चेअरमन संतोष राजगुरू,व्हाईस चेअरमन रत्नमाला मुळे, संचालक सुभाष चाटे, संदीपान जाधव, विनोद आ-रसूळ, उद्धव खांडेभराड, हरिभाऊ भोसले, उद्धव बाजड, कल्याण वाघमारे, वराडे अमोल, वाघमारे दत्ता, महादेव वैराळ , गाडेकर ईश्वर , श्रीमती वैशाली भिसे या संचालक मंडळासह कर्मचारी व शिक्षकांची उपस्थिती होती.

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या विविध कर्ज योजनेसाठी अर्ज सादर करावेत

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या, जिल्हा कार्यालय जालना येथे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अनुदान योजनेअंतर्गत ८५ कर्ज प्रकरणाचे उद्दीष्ट असून बीज भांडवल योजनेअंतर्गत ८५ कर्ज प्रकरणांचे व थेट कर्ज योजनेअंतर्गत २४ कर्ज प्रकरणांचे उद्दीष्ट आहे. अर्जासोबत जातीचा दाखला उत्पन्नाचा दाखला, शिधापत्रिकेची प्रत, शिधापत्रिका, आधार कार्ड, पॅन कार्ड, कोटेशन, प्रकल्प अहवाल, व्यवसाय जागेचा पुरावा, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, व्यवसायाचे लायसन्स सादर करणे आवश्यक आहे. तरी नवबौध्द समाजातील व अनुसूचित जातीमधील अर्जदारांनी लाभ घेण्यासाठी ऑगस्ट २०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने mahadisha.mpbcdc.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) तथा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललित गांधी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी ३ वाजता जिल्हा प्रशासनासोबत बैठक घेऊन जिल्ह्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण व नागरी क्षेत्रविकास कार्यक्रमासह अल्पसंख्याकांना देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेतला.




यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सुर्यवंशी, जिल्हा व्यवस्थापक एकनाथ कांबळे, सा. बां. कार्यकारी अभियंता स्मिता पवार यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले की, अल्पसंख्याक समुदायाची लोकसंख्या विच-रात घेवून जिल्ह्यात एकुण १२२ मदरसे व शाळा असून त्यापैकी अल्पसंख्याक जैन समाजाच्या ४ शाळा आहेत त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. अल्पसंख्याक समुदायाच्या भागातील रस्ते, गटारी, सभागृहाची राहिलेली अपूर्ण कामे वेळेत पार पाडावी. जालना शहरातील गुरु गणेश भवनाला ब वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा मिळण्यासाठीचा प्रस्ताव लवकर पाठविण्यात यावा. तसेच इतर चारही जैन समाजाच्या प्राचिन मंदिरांना क वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा मिळण्यासाठी देखील तात्काळ प्रस्ताव सादर करावेत. असे निर्देशही त्यांनी दिले. जालना शहरातील सदर बाजार जैन मंदिरासमोरील रस्ता करण्याची प्रक्रिया सुरु करावी तसेच तिथे वाहतुक जास्त परंतू रस्ता रुंदीकरण कमी असल्याने तो मार्ग वन वे करावा. जिल्हा उद्योग केंद्राकडील अल्पसंख्याक समुदायासाठी ३ टक्के राखीव असलेली कर्ज प्रकरणे तातडीने मार्गी लावावी. तसेच व्यवसाय कोणत्या पध्दतीने केला पाहिजे यासाठी जिल्हा उद्योग केंद्र आणि बँकांनी शिबीरे घेवून गरजवंतांना कर्ज मंजूर करावेत. अशी सुचनाही केली. जालना जिल्ह्याला अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी देण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# आय.टी.आय.मध्ये विजय दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड येथील महर्षी कणाद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबड मध्ये कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला.

मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून प्राचार्य राजेश धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमास अध्यक्षस्थानी गट निदेशक आर.जी. डोईजड तर प्रमुख वक्ते म्हणून संतोष दह्याळकर, माजी सैनिक एन. बी. चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करून सुरू झालेल्या या कार्यक्रमास माजी सैनिक एन. बी. चौधरी यांनी युद्धाविषयी थरारक अनुभव आणि सीमा रेषेवरील सैन्याच जीवन प्रवासावर प्रकाश टाकला त्यावेळी उप-स्थितांच्या अंगावर शहारे आले.

संतोष दह्याळकर यांनी मार्गदर्शन करतेवेळी कारगील युद्धाची पार्श्वभूमी, युद्धनीती यावर मत मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद बनसोडे आणि आभार जे. बी. साळुंके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी एल.व्ही. पुपले, आर.एन. सावंत, दत्ता चौधरी, योगेश आठवले, एस.एम. मतकर आदींनी परिश्रम घेतले.

# जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांची योगेश नगर व महादेव मंदिर परिसराला भेट



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांनी आज जालना महानगरपालिका क्षेत्रातील योगेश नगर व महादेव मंदिर भागाला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या विविध समस्या जाणून घेतल्या. पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, सांडपाण्याचा निचरा, वीजपुरवठा यासारख्या मूलभूत सुविधा संदर्भातील अडचणी नागरिकांनी श्री. दानवे यांच्यासमोर मांडल्या.

या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देत त्यांनी तातडीने आवश्यक ती कार्यवाही करून समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी भाजपचे पदाधिकारी सिद्धिविनायक मुळे, गोवर्धन कोल्हे, सुनील पवार, सुमित सुरडकर, गोपाळ कदम आदी उपस्थित होते. या भेटीत परिसरातील महिला मंडळाचाही सक्रिय सहभाग होता. गुढे आई, फलके ताई, जुंबड ताई, रामदासी आई, राठोड ताई, कोरडे ताई, खरात ताई, जाधव ताई, गायकवाड ताई, चव्हाण ताई यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या. श्री. दानवे यांनी परिसरातील प्रश्नांचा स्थायी नायनाट करण्यासाठी महापालिका प्रशासनाशी समन्वय साधून लवकरच ठोस पावले उचलण्यात येतील, असे सांगितले.

# स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याचा प्रशासनाला पडला विसर

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाची बाजी लावत अहोरात्र यो-गदान दिले आहे.तर अनेक स्वातंत्र्यसैनिकांना त्यात वीरमरण देखील आलेले आहे.तेव्हाच भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले. पण हल्लीच्या काळात स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याचा विसर प्रशासनातील अधिकाऱ्यांना पडल्याचे दिसून येत आहे. त्याच बरोबर राज्यकर्ते देखील या घटने कडे सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.

गेल्या काही महिन्यापासून तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नीचे वारस निवृतीवेतन रखडले आहे.त्यात तालुक्यातील बोरगाव बु. येथील स्वातंत्र्य सैनिक सखाराम तुकाराम फदाट(बापू )हे ०१ डिसेंबर २०२४ रोजी मयत झाले होते. त्याच बरोबर वरुड बु येथील स्वातंत्र्य सैनिक किसनराव सुखदेवराव घाटगे हे २६ ऑक्टोंबर२०२४रोजी मयत झाले होते. त्यांचे पुढील निवृत्तीवेतन मिळण्यासाठी या दोन स्वातंत्र्य सैनिकांच्या

## मयत स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नीचे वारस निवृत्ती वेतन मंजूरीसाठी हेलापाटे

वारसांनी पुढील वारस निवृत्ती वेतन प्रस्ताव तहसील कार्यालय जाफ्राबाद येथे सर्व कागदपत्रे सहीत सादर केला होता. मात्र ४-५ महिने होऊनही त्यांना स्वातंत्र्य सैनिक वारस आणि निवृत्ती वेतन मंजूर झाले नाही. स्वातंत्र्य सैनिक यांच्या वारसांनीतहसील कार्यालय जाफराबाद यांच्याकडे अनेक वेळा चकरा मारल्या,तरी देखील त्यांना अपेक्षित उत्तर मिळाले नाही.ज्यांनी आपल्या जिवाची बाजी लावत देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले अशा स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांवर अशी वेळ येणं हे अत्यंत क्लेशदायक आहे. त्यामुळे तालुक्याच्या प्रशासनात काम करणाऱ्या एक महिला असुन,त्या स्वातंत्र्यसेनानी यांच्या वारसपत्नी या महीलेप्रती जराही सवेंदनशील दिसत नाहीत, यामुळे महिला तहसीलदार सारिका भगत यांच्या विरोधात संताप व्यक्त होत आहे.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्या घेऊन स्वाभिमानी शेतकरी संघटना उपजिल्ह्याधिकाऱ्यांच्या दालनात!

## तात्काळ मागण्या मान्य न केल्यास आंदोलन छेडणार -गणेश राजबिंडे यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना फार्मर आयडीची अट असल्यामुळे खरीप हंगाम २०२५ साठी केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. यामुळे अनेक शेतकरी पिक विमा योजनेपासुन वंचीत राहतील कारण ३१ जुलै २०२५ ही पिक विमा भरण्याची शेवटची तारखी जवळ आली असतांना हजारो शेतकरी विम्यापासुन वंचित राहण्याची स्थिती प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे, फारमर आयडी काढण्यासाठी जणजागृती नसल्यामुळे, अनेक शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी



उपलब्ध नाहीत. अनेक शेतकऱ्यांनी वेळेत अर्ज करुन देखील त्यांना अद्यापर्यंत फार्मर आयडी प्राप्त झालेले नाही. त्यामुळे त्यांनी पिक विमा भरतायेत नाही. म्हणुन नैसर्गीक आपत्ती आल्यास त्याचे पिक विमा न भरल्यास होणारे नुकसानातुन आर्थिक संरक्षण मिळणार नाही. यामुळे पिक विमा भरण्याची तारीख वाढवुन द्यावी तसेच अन्य शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी स्वाभीमानी शेतकरी संघटनेच्या वतीने एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात पुढे महटले आहे की, पिक विमा भरण्याची अंतीम तारीख किमान ३० दिवसांची मुदतवाढ द्यावी., २०२४ माहे सप्टेंबर मध्ये मंठा व परतूर येथे झालेल्या अतिवृष्टी मधील वगळलेल्या महसुल मंडळाचे अतिवृष्टी अनुदान तात्काळ द्यावे, २०२३, २०२४ मधील पिक विमा शेतकऱ्यांना तात्काळ वितरीत करावा, ज्या शेतकऱ्यांनी अर्ज करुन सुध्दा खऊ मिळाले नाहीत त्यांना तात्पुरत्या/स्वरुपति विमा भरण्याची परवानगी द्यावी, बऱ्याच शेतकऱ्यांचे आधार अपडेट नसल्याने फार्मर आयडी निघत नाही, त्यामुळे आधार सेंटर संस्था वाढवाव्यात, फार्मर आयडी जारी करण्याची प्रक्रिया त्वरीत पुर्ण करण्यात यावी २१ जुलै २०२५ रोजी परतूर व मंठा तालुक्यातील सातोना, आष्टी तर मंठा तालुक्यातील तळणीचा महसुल मंडळाला तात्काळ अतिवृष्टी अनुदान देण्यात यावे. यावरील सर्व मागण्या तात्काळ मान्य कराव्यात व त्यावर कोणती कार्यवाही केली याचा लेखी स्वरुपात अहवाल देण्यात यावा. नसता स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील याची नोंद घ्यावी असा इशारा स्वाभीमानी शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष परतूर गणेश सिताराम राजबिंडे यांच्यासह हभप शिवाजी महाराज भोसले, नामदेवराव खोसे, शिवाजी सर्व डोगडे, नंदुभाऊ कड़े, भरत भाउकाले, गुलाबराव कडे, महादेवराव राजकडे दुगाने अशोक रामभाम सखाराम महाराज रोहीणा सहबाराम, बिडवे बाभाऊ यांच्यासह आदींनी दिला आहे.

## मोटोरोलाकडूनमोटो जी८६ पॉवर लाँच

मुंबई : मोटोरोला या मोबाइल तंत्रज्ञानामधील जागतिक अग्रणी आणि भारतातील आघाडीच्या एआय स्मार्टफोन ब्रँडने आज मोटो जी८६ पॉवर च्या लाँचची घोषणा केली. जी-सिरीज लाइनअपमधील हा परिपूर्ण ऑल-राऊंडर फोन सब २०,००० रूपये सेगमेंटला नव्या उंचीवर घेऊन जातो. मोटो जी८६ पॉवर मध्ये फ्लॅगशिप-लेव्हल वैशिष्ट्ये आहेत, जसे सेगमेंटमधील सर्वात प्रखर ६.६७ इंच १.५के पीओएलईडी सुपर एचडी फ्लॅट डिस्प्लेसह ४५०० नीट्स सर्वोच्च ब्राइटनेस, १२० हर्टझ रिफ्रेश रेट आणि गोरिला ग्लास ७आय प्रोटेक्शन. या स्मार्टफोनमध्ये सेगमेंटमधील अग्रणी ५० एमपी ओआयएस सोनी एलवायटीआयए' ६०० कॅमेरासह मोटो एआय आणि सर्व लेन्सेसमध्ये ४के व्हिडिओ रेकॉर्डिंग आहे, ज्यासोबत ८ एमपी अल्ट्रावाइड + मॅक्रो व्हिजन लेन्स आणि ३२ एमपी सेल्फी कॅमेरा आहे.

## वी ने छत्रपती संभाजीनगरमध्ये ५जी सेवांचा शुभारंभ केला

छत्रपती संभाजीनगर -देशातील आघाडीची टेलिकॉम कंपनी, वी छत्रपती संभाजीनगर आणि नाशिकमध्ये उद्यापासून आपल्या ५जी सेवांचा शुभारंभ करत आहे. या महिन्याच्या सुरुवातीला वी ने नागपुरात ५जी सेवा सुरु केल्या. ज्याठिकाणी वी ला ५जी स्पेक्ट्रम मिळाले आहे अशा १७ प्रायॉरिटी सर्कल्समध्ये २३ शहरांमध्ये ५जी सुरु करण्याच्या मोहिमेचा हा विस्तार एक भाग आहे. वी चे ५जी उद्या अहमदाबाद, राजकोट, सुरत, वडोदरा, कोझिकोडे आणि मलप्पुरम या ६ इतर शहरांमध्ये देखील सुरु होत आहे. याआधी वी ने ९ शहरांमध्ये ५जी सेवा सुरु केल्या आहेत, यामध्ये मुंबई, दिल्ली-एनसीआर, बंगलोर, म्हैसूर, नागपूर, चंदीगढ, जयपूर, सोनिपत आणि पटना या नऊ शहरांचा समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर आणि नाशिकमधील ५जी डिव्हायसेस वापरणारे वी युजर्स उद्यापासून वी ५जी सेवांचा लाभ घेऊ शकतील. शुभारंभाची ऑफर म्हणून वी २९९ रुपयांपासून पुढील किमतींच्या प्लॅन्सवर युजर्सना अनलिमिटेड ५जी डेटा देत आहे. त्यामुळे ग्राहकांना हाय-डेफिनिशन स्ट्रीमिंग, गेमिंग, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, अधिक वेगवान डाउनलोड आणि रिअल-टाईम क्लाऊड ॲक्सेस यांचा आनंद घेता येईल.

## ग्राहकांसाठी 'ड्रॉप झोन' सेवा सुरू

मुंबई : ग्राहकांना उत्तम अनुभव देण्यासाठी, तैवानची तंत्रज्ञान कंपनी आसूसने आज आपल्या आसूस एक्सक्लुझिव्ह स्टोअर्समध्ये 'ड्रॉप झोन' नावाची एक नवीन सेवा सुरू केली आहे. या सुविधेमुळे ग्राहकांना त्यांचे लॅपटॉप दुरुस्तीसाठी थेट सर्व्हिस सेंटरला घेऊन जाण्याची गरज नाही. त्याऐवजी, ते आता जवळच्या आसूस स्टोअरमध्येच आपले लॅपटॉप जमा करू शकतील. यामुळे ग्राहकांना खूप सोयीचे होईल आणि त्यांना त्यांच्या उपकरणांशिवाय जास्त काळ राहावे लागणार नाही.आसूस इंडियाने देशात एक मोठे विक्रीपश्चात सेवा नेटवर्क तयार केले आहे. देशभरात २०० पेक्षा जास्त सर्व्हिस सेंटर्स, १४,९०० पेक्षा जास्त पिनकोडमध्ये घरी जाऊन मदत (ऑन-साईट होम सपोर्ट) आणि ७६१ जिल्ह्यांमध्ये सेवा उपलब्ध आहे. याशिवाय, आसूस २४७ कॉल, चॅट, ईमेल आणि रिमोट ट्रबलशूटिंग अशा डिजिटल माध्यमातूनही मदत पुरवते. माय-आसूस प आणि यू - ट्यूब वरील खास चॅनेल्समुळे ग्राहक स्वतःच आपल्या प्रश्नांची उत्तरे कधीही, कुठेही शोधू शकतात.

## राज शमानी आता आसुस एक्सपर्टबुक चे ब्रँड ॲम्बेसेडर

नवी दिल्ली : 'फिगरिंग आउट विथ राज शमानी' या लोकप्रिय पॉडकास्टचे संस्थापक आणि होस्ट राज शमानी यांची आसुस एक्सपर्टबुक सिरीजः बिल्ट फॉर वॉरी फ्री बिझनेस' या कंपनीसाठी अधिकृत ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात आली आहे. 'फिगरिंग आउट विथ राज शमानी' या पॉडकास्टसाठी प्रसिद्ध आहेत, ज्याचे १८ मिलियन+ सबस्क्राइबर्सचे प्रचंड फॉलोअर्स आहेत आणि प्लॅटफॉर्मवर ८बिलियन+ व्ह्यूज आहेत, ते आसुस एक्सपर्टबुक ची मूल्ये दर्शवतातः विश्वास, लवचिकता, नावीन्य, स्वतः बनवलेले यश, अथक उत्सुकता आणि इतरांना सक्षम करण्याची इच्छा.

## घरवाली पेडवाली'मध्ये पारस अरोरा जीतूच्या भूमिकेत!

नाविन्यपूर्ण कथानकाचे मनोरंजन देण्याप्रती आपली कटिबद्धता कायम राखत एण्ड टीव्ही नवीन काल्पनिक मालिका 'घरवाली पेडवाली' लवकरच सुरू करणार आहे. पेनिन्सुला प्रोडक्शन्सद्वारे निर्मित या नवीन कौटुंबिक विनोदी मालिकेमध्ये विलक्षण अलौकिक शक्तीसंदर्भातील ट्विस्ट आहे, ज्यामधून हास्यपूर्ण, गोंधळयुक्त व हृदयस्पर्शी क्षणांचे मनोरंजन मिळेल. या मालिकेमध्ये प्रमुख पात्र आहे साधा-भोळा जीतू, ज्याचे जीवन वाटते तितके सामान्य नाही. त्याच्या दोन आई व दोन वडिल आहेत, त्याचे दोन बॉसेस् आहेत आणि नशीबातील विलक्षण बाब म्हणजे त्याच्या दोन पत्नी आहेत. जीतूची भूमिका साकारण्यासाठी लोकप्रिय टेलिव्हिजन अभिनेता पारस अरोराची निवड करण्यात आली आहे, जो या मालिकेसह विनोदी शैलीमध्ये पुनरागमन करत आहे.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात एक पेड मा के नाम संपन्न



सोयगाव,दि.३० जुलै - येथील अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात हरित महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र अभियान अंतर्गत एक पेड मा के नाम कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यामध्ये वृक्ष लागवड कार्यक्रम घेण्यात आला. उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत बी.एड.कॉलेजचे प्राचार्य डॉ.राजेश यादव,डॉ.सी.यू.भोरे,डॉ. पंडित नलावडे,प्रा.विनोद चव्हाण,डॉ.प्रमोद पवार,डॉ.रमेश औताडे,प्रा. अन्वर सय्यद,डॉ.पांडुरंग डापके,डॉ.दिपक पारधे, प्रा.ज्योती स्वामी व सुनील वाघ यांनी वृक्ष लागवड करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## जि.प. प्रा. शाळा रामजीनगर येथे एक राखी सैनिकांसाठी उपक्रम; उपक्रमास लाभले सखी मंचाचे सहकार्य



सोयगाव,दि.३० जुलै : उपक्रमशील शाळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे रक्षाबंधन सणानिमित्ताचे औचित्य साधून सचिन शिंदे गटशिक्षणाधिकारी सोयगाव तसेच फिरोज तडवी केंद्र प्रमुख सोयगाव यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील तसेच सहशिक्षक गोपाल चौधरी यांनी शाळेतील सखी मंच यांच्या सहकार्याने विद्यार्थ्या कडून उत्कृष्ट अशा राख्या तयार करून या राख्या आपल्या देशाचे संरक्षण करणार्या सैनिक बांधवाना देशाच्या सिमेवर लेह लडाख येथे पाठविण्यात आल्या आहेत.या उपक्रमास शाळेतील सखी मंचच्या माता (सदस्या)वैशाली पवार,गुम्फाबाई इंगळे,लताबाई ठोबरे,लताबाई गायकवाड,सुनिता जाधव,मनिषा जेठे,संगिता खिल्लारे,मिराबाई वावरे यांनी सहकार्य केले तसेच विद्यार्थ्याना राखी बनविण्याचे मार्गदर्शन केले. एक राखी सैनिकांसाठी या उपक्रमाबद्दल पालकांनी शाळेचे अभिनंदन करून विद्यार्थ्याचे कौतुक केले.यावेळी स्वत:च्या हाताने राखी तयार केल्याचा आनंद विद्यार्थ्याच्या चेहर्यावर दिसून येत होता.उपक्रम यशस्वीततेसाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सहशिक्षक गोपाल चौधरीप्रशिक्षक शिक्षक शुभम देसले यांनी परिश्रम घेतले.

# नाथसागराचा पाणीसाठा ९०.१३ टक्के

तभा वृत्तसेवा

पैठण दि ३० :- मराठवाड्यासाठी वरदान लाभलेल्या श्रीक्षेत्र पैठणच्या नाथसागर जलाशयाचा पाणीसाठा ९०.१३ टक्के एवढा झाला असून जुलै महिन्यातच नाथसागर भरल्याने शेतकरी, व्यावसायिक, उद्योजक यांच्यात आनंदाचे वातावरण आहे. धरणाचा पाणीसाठा ९३ टाक्यांच्या वर गेल्यावर गोदावरी पात्रात धरणातून विसर्ग करण्यात येणार आहे.दरम्यान पैठणचे आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्याहस्ते



गुरुवारी जलाशयाच्या पाण्याचे विधीवत पूजन होणार आहे.

जलाशय पाणलोट क्षेत्रात कमी पाऊस असून सुद्धा नाशिक आणि अहिल्यानगर भागात झालेल्या जोरदार पाऊसामुळे नाथसागर जलाशयातील पाणीसाठा उफानावर आला आहे.यंदाच्या मानसून मध्ये जून महिन्यापासून नाथसागर जलाशयात पाण्याची आवक येण्यास सुरुवात झाली.नाथसागर धरण पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी आणखीन पाच फूट पाणी साठ्याची आवश्यकता असून यामुळे लाटांचे पाणी थेट २७ गेट वरून खाली कोसळतांना दिसणार आहे.नाथसागर धरणात १६ हजार २३० क्युसेक प्रमाणे पाण्याची आवक होत असून धरणाचा पाणीसाठा हा ९०.१३ टक्के एवढा झाला आहे. तर धरणाचा जिवंत पाणीसाठा १९५६.६७ दशलक्ष घनमीटर इतका आहे.

# जिल्हा प्रशासन आणि टोयोटा किर्लोस्कर यांच्यात सामंजस्य करार

### बिडकीन येथे जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळेच्या विकासासाठी पुढाकार

छत्रपती संभाजीनगर,दि.२९ बिडकीन येथे जिल्हा परिषदेच्या शाळेची इमारत बांधकाम करण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि टोयटा किर्लोस्कर मोटर्स प्रा. लि.यांच्यात आज सामंजस्य करार झाला. टोयटा किर्लोस्कर या कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून हे बांधकाम होणार आहे.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत आणि टोयोटा किर्लोस्कर कंपनीच्या वतीने संचालक सुदीप दळवी यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यावेळी उपस्थित होते. जिल्हा प्रशासन आणि कंपनी मिळून विविध क्षेत्रात सहकार्य करुन जिल्ह्याच्या विकासासाठी योगदान देऊ असा विश्वास यावेळी दोन्ही बाजूंनी व्यक्त करण्यात आला.

आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात यासंदर्भातील सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ) जयश्री चव्हाण, जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य) आश्विनी लाटकर, प्राचार्य जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था डॉ. आर.डी. कांबळे, उपजिल्हाधिकारी विजय राऊत, संगिता राठोड, टोयटा किर्लोस्कर कंपनीच्यावतीने वरिष्ठ उपाध्यक्ष तथा संचालक सुदीप दळवी, जनरल मॅनेजर रवी सोनटक्के व प्रोजेक्ट जनरल मॅनेजर जगदीश पी.एस. तसेच अन्य अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते. शाश्वत सामाजिक प्रभाव आणि सर्वसमावेशक समुदाय विकासाच्या दिशेने कटिबद्धता राखत टोयोटा किर्लोस्कर मोटर्स प्रा. लि.ने महाराष्ट्र शासनासोबत आज सामंजस्य करार केला. या करारांतर्गत बिडकीन येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचा सर्वांगीण पायाभूत विकास करण्यात येणार आहे.

# जगातील पहिला गुरु जर कोणी असेल, तर तो आहे आई : उपाध्याय विरंजन सागर जी महाराज

छत्रपती सभाजीनगर प.पु.आचार्य समाधीसम्राट विरागसारजी महाराज यांचे प्रभावक शिष्य प.पु.पटटाचार्य विशुध्दसागरजी महाराज यांचे आज्ञानुवर्ती शिष्य प.पु. उपाध्याय १०८ विरंजनसागरजी महाराज, मुनिश्री विनीशोधसागरजी महाराज, मुनिश्री विसौम्यसागरजी महाराज, प.पु.क्षुल्लिका विशिलाश्री माताजी यांचा चातुर्मास श्री.१००८ मल्लीनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुखनगर,शिवाजीनगर येथे सूरू असून विशेष प्रवचनात विरजणसागर महाराज यानी सागीतले की ब्रह्मांडातील सर्वात गोड आणि प्रिय शब्द जर कुठला असेल, तर तो म्हणजे आई. आईने तीर्थंकरांना आणि गुरूंना जन्म दिला आहे. मरणाचे हजार मार्ग आहेत, पण जन्माचा मार्ग एकच आहे - आणि तो म्हणजे आई.

आई ही हजार शिक्षकांच्या बरोबरीची असते. जे शिक्षण हजार शिक्षक देऊ शकत नाहीत, ते एक आई आपल्या मुलांना संस्कारांद्वारे देते. आई हिमालयासारखी भक्कम असते, पण हिमालयासारखी कठोर नसते; आई समुद्रासारखी विशाल असते, पण समुद्रासारखी खारट नसते. आईच खऱ्या अर्थाने संस्कार देते. जेव्हा औषध काम करत नाही, तेव्हा आईची दुवा (आशीर्वाद) काम करते. आई म्हणजे ममता, आई म्हणजे मंदिर, तीर्थ, पूजा-थाळी - आईशिवाय जीवन पोकळ आहे. जगात आईपेक्षा मोठं काहीच नाही. जगातील पहिला गुरु जर कोणी असेल, तर तो आहे आई. आईनेच भगवानाची आणि गुरुंची ओळख करून दिली.

जो आईचा सन्मान करतो, तिचे पाय धरतो, त्याचे अशक्य कार्यही शक्य होतात. मुनिश्री म्हणाले, आईच्या महिमेचं वर्णन करणं अशक्य आहे. आपण आईचं आणि वडिलांचं ऋण कधीही फेडू शकत नाही. आई आपले आयुष्य, सेवा, प्रेम सर्व काही आपल्या मुलांसाठी अर्पण करते. वडील दिवसरात्र मेहनत करून फक्त मुलांच्या शिक्षणासाठी पैसा कमावतात. स्वतः उपाशी राहूनसुद्धा मुलांसाठी दूध आणतात. आई-वडिलांची महती सांगणं केवळ शब्दांत शक्य नाही. तरीही मुनिश्रींनी सांगितलं की, जर तुम्हाला आयुष्यात आई-वडिलांचं ऋण थोडं जरी उतरवायचं असेल, तर चार गोष्टी कायम लक्षात ठेवा:

कधीही आईचा राग करू नका, तिचं मन दुखावू नका. आठवड्यातून एक दिवस तरी आई-वडिलांसोबत बसून भजन करा. वर्षातून एकदा तरी त्यांना तीर्थयात्रेला न्या. तुमच्या मोबाईलमध्ये आई-वडिलांचा फोटो ठेवा. जेव्हा केव्हा दान देता, ते त्यांच्याच नावाने द्या. मुनिश्रींनी समाजाला उद्देशून सांगितलं की, आई-वडिलं आपल्या मुलांना वसीयत (मिळकती) देऊन जातात, पण संत निरंजन सागरजी तुमच्यासाठी वसीयत नाही, पण नसीहत (सल्ला) जरूर देऊन जातील. या प्रवचनामध्ये जैन समाजातील वरिष्ठ मंडळी, विविध ग्रुप्स, महिला मंडळ यांची उपस्थिती होती. हजारो भक्तांनी गुरुभक्ती करत धर्मलाभ घेतला.

# विद्यार्थ्यांनी आजीवन विद्यार्थी रहावे : प्रा. शेंडगे

तभा वृत्तसेवा

पैठण दि ३० : विद्यार्थी हा ज्ञानात्मक असावा. त्यांने आजन्म नवे नवे ज्ञान प्राप्तीसाठी धडपड करावे. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास हा केवळ ज्ञान प्राप्तीने होतो. बाह्य व्यक्तिमत्त्वापेक्षा माणसाच्या अंतरिक व्यक्तिमत्व आणि गुणात्मक विकासासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी रात्रंदिवस अभ्यास आणि त्यासाठी गुरुजनांचे मार्गदर्शन मिळावे याकरिता विद्यार्थ्यांनी नियमित महाविद्यालयामध्ये आले पाहिजे असे प्रतिपादन प्रोफेसर



सुधाकर शेंडगे यांनी केले. ते प्रतिष्ठान महाविद्यालयात संपन्न झालेल्या कै. भाऊरावजी पाटील शिसोदे स्मृतिदिनाच्या कार्यक्रमात बोलत होते.

प्रा, शेंडगे पुढे बोलतांना म्हणाले की कै.भाऊराव पाटील शिसोदे सारख्या महापुरुषांनी शेतकऱ्यांच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी याकरिता धडपड केली आणि हे महाविद्यालय उभे केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नारायणराव गोंडे पाटील हे होते.

या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष रवींद्र पाटील शिसोदे, सचिव राजेंद्र पाटील शिसोदे, संचालक श्रीधरराव पाटील शिसोदे, सुशील पाटील शिसोदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. सोनकांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हंसराज जाधव तर आभार डॉ. अर्जुन मोरे यांनी मानले. याप्रसंगी प्राध्यापक, कर्मचारी सह विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थित होती.

# श्री सरस्वती भुवनच्या विद्यार्थ्यांची गिरनेरा डोंगर परिसर येथे गिरी भ्रमण मोहीम

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ३० जुलै : पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथील एन.सी.सी. व क्रीडा विभागातील खेळाडूंनी गिरनेर तांडा येथील डोंगर यशस्वीपणे चढाई करून श्री. सरस्वती भुवन शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगरने आयोजित केलेली गिरीभ्रमण मोहिम यशस्वी केली. जेष्ठ स्वातंत्र्यसेनानी पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी संस्थेच्या वतीने गिरीभ्रमण मोहिमेचे आयोजित केल्या जाते. विद्यार्थ्यांमध्ये साहसी



वृत्ती निर्माण व्हावी, त्याचबरोबर पर्यावरण संरक्षण व संवर्धन यांच्या विषयी सजगता निर्माण व्हावी या उद्देशाने या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये विद्यार्थ्यांनी पक्ष्यांचे व वनस्पतींचे निरीक्षण करून डोंगर चढण्याचा थरार अनुभवला. या मोहिमेत प्रशालेतील १४१ विद्यार्थी व ९ शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता . गिरीभ्रमण मोहीम यशस्वी करण्यासाठी एन.सी.सी अधिकारी बाबासाहेब सोकटकर, क्रीडा शिक्षक अनिल कांबळे, आसिफ शेख , राहुल शिंदे, अविनाश खैरे , ज्ञानेश्वर चाटुपळे,रोहन डोंगरे, पूजा मिसाळ , सुकन्या म्हारोळकर यांनी प्रयत्न केले. गिरी भ्रमण मोहीम यशस्वी झाल्याबद्दल डॉ मिलिंद कोनार्डे, शालेय समितीचे अध्यक्ष किसनलाल तोतला,प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेद्र येवले, उपमुख्याध्यापक युवराज पाडळे ,पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा, प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे , शालेय समितीचे सर्व सदस्य, शिक्षक शिक्षिका शिक्षकेत्तर सहकारी यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# २५०० रुपयापर्यंत घरगुती बिलासाठी तीन किलो वॅट सोलार उपयुक्त - सौरभ मार्दा

**नारायण गायकवाड**

छत्रपती संभाजीनगर - महिन्याला २०० युनिट लागणाऱ्या आणि २५०० पर्यंत घरगुती वीजबिल येत असेल, तर तीन किलो वॅट घराच्या छतावरील सोलार ग्राहकांसाठी उपयुक्त असून पंतप्रधान सूर्यघर मोफत विज योजना सारख्या योजनेमार्फत सरकार ७८ हजार रुपये पर्यंत सबसिडी उपलब्ध करून देत असल्याचे फ्रेअर एनर्जी रूफटॉप सोलर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ मार्दा म्हणाले ते त्यांच्या छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.



पुढे बोलताना सौरभ मार्दा म्हणाले की, घरगुती छतावरील तीन किलो वॅटच्या सोलार ला दोन लाख रुपयापर्यंत खर्च येत असून शासन सबसिडी मार्फत ७८ हजार रुपये ग्राहकाला देत आहे. यामुळे सव्वा लाख रुपये पर्यंत ग्राहकाला सोलार बसवणे पडत आहे. हे सोलार वर्षाकाठी ३० ते ३५ हजार रुपयांची बचत करणार आहे तर औद्योगिक क्षेत्रातील वापरात ही बचत लाखो रुपयात होत आहे. कंपनीचे अकरा हजारहून जास्त ग्राहक असून, राज्यामध्ये पुणे ,नाशिक ,नागपूर आणि आता छत्रपती संभाजीनगर येथे त्यांची कार्यालय उपलब्ध आहे. प्रत्येक आठवड्याला दीडशे ते २०० नवीन ग्राहक त्यांच्याशी जोडले जात असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगर येथील फ्रेअर एनर्जी कार्यालयात भौतिक स्वरूपात सोलार घटकांचा ग्राहकांना अनुभव घेता येणार आहे. या कार्यालयात पॅनल्स, इन्वर्टर, माउंटिंग, स्ट्रक्चर आणि सुरक्षा प्रणाली आदी ग्राहक खरेदी करण्यापूर्वी पाहू शकणार आहे.

## अवकारीका' १ ऑगस्टला चित्रपटगृहात

छत्रपती संभाजीनगर : स्वच्छता ही सवय आहे, असे म्हटले जाते. ही सवय घराच्या चार भिंतीतच का राहते? आपण आपल्या घराच्या स्वच्छतेइतके आपल्या परिसराच्या स्वच्छतेबद्दल जागरूक राहिलो तर घर, परिसर तर स्वच्छ राहीलच, आपोआप शहर आणि देशही स्वच्छ राहील. हाच विचार घेऊन रेडबड मोशन पिक्चर या बॅनरअंतर्गत येत्या १ ऑगस्टला 'अवकारीका' हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अरविंद भोसले यांचे आहे. चित्रपटाची निर्मिती भारत टिळेकर, अरुण जाधव यांनी केली असून सहनिर्मिती मनोज गायकवाड, अरविंद भोसले, मृणाल कानडे, गीता सिंग यांची आहे.कचऱ्याच्या ढिगावरच ज्यांचे आयुष्य तरले आहे, अशाच्यां वेदनेचा शोध घेताना, स्वच्छता दूताला माणसासारखे आयुष्य जगायला मिळावे, त्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळावी, त्यांच्या श्रमाचे योग्य मोल व्हावे, या भावनेतून 'अवकारीका' चित्रपटाची निर्मिती - दिग्दर्शन केल्याचे अरविंद भोसले सांगतात.

## श्री मोहटादेवी विद्यालयात एक पेड मॉ के नाम उपक्रम

बिडकीन दि ३० जुलै : पैठण तालुक्यातील म्हारोळा येथील श्री मोहटादेवी विद्यालयात मध्ये एक पेड मॉ के नाम उपक्रम प्रत्येक घरोघरी राबविन्यात येत आहे.आज दि २८ जुलै रोजी विद्यालयाच्या वतीने सर्वांना वृक्ष वाटप करण्यात आले.या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक महेश घोरतळे,सुभाष गवई ,दिपक कर्डीले , ज्योती गायकवाड,सतिश मुखेकर,प्रशात शेळके सर,परेश शिन्दे ,कापसे ,पठाण मॅडम,शंकर शिरसाठ,अनिता डोंगरे,बद्री धरपळे. रमेश ऋषी. कर्मचारी शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले. सदर उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ.धनंजय मुखेकर,संस्थापकीय सचिव .वंदना मुखेकर,दहिहाडें ,यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

## श्री स. भु. प्रशाला येथे कारगिल विजय दिवस साजरा




बिडकीन दि ३० जुलै - पैठण तालुक्यातील श्री स. भु.प्रशाला बिडकीन येथे एनसीसी विभागा तर्फे कारगिल विजयी रॅलीचे आयोजन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांची कारगिल युद्धावर आधारित पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक येवले धर्मेंद्र, उपमुख्याध्यापक युवराज पाडळे , पर्यवेक्षिका श्रीमती मिश्रा मनीषा मॅडम, प्राध्यापक सुदाम चिंचाने, क्रीडा शिक्षक शेख आसिफ व राहुल शिंदे सर उपस्थित होते. मान्यवरांचे आभार ट्रूप कमांडर चिफ ऑफिसर बाबासाहेब सोकटकर यांनी मानले.

## श्री स. भु. प्रशाला बालानगर येथे 'वाचन कोपरा' स्थापन




बिडकीन दि ३० जुलै - पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशाला बालानगर येथे विद्यार्थ्यांत वाचनाची गोडी वाढावी यासाठी 'वाचन कोपरा' स्थापन करण्यात आला.यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक राजेंद्र गायकवाड, शालेय समितीचे अध्यक्ष सत्यनारायणजी सोनी, शाळेचे ग्रंथपाल राहुल जाधव तसेच प्रशालेतील शिक्षकशिक्षकेतर सहकारी उपस्थित होते. या वाचन कोपऱ्यात विद्यार्थ्यांत वाचनाची गोडी वाढावी यासाठी विविध वर्तमानपत्रे, नियतकालिके व बालोपयोगी वाचन साहित्य ठेवण्यात आलेले आहे.


## जाहीर प्रगटन

दि.११/०८/२०२५

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ४४०/२०२५

अर्जदारः- १. शंकर आन्नाराव पोळ, वय. ६५ वर्ष धंदा. शेती रा. रेल्वे स्टेशन रोड, अनंतपूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर २. किरण शंकरराव पोळ, वय. ४२ वर्ष धंदा. शेती रा. सावंगी, लासूर स्टेशन ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३. अनिल शंकरराव पोळ, वय. ३९ वर्ष धंदा. शेती रा. लासूरगांव रोड, धूत हॉस्पीटलच्या पाठीमाघे, लासूर स्टेशन ता. गंगापूर जि.छ.संभाजीनगर

- विरूद्धः-

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण - कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ यांची पत्नी तसेच अर्जदार नं. २ व ३. यांची आई नामे नंदाबाई शंकरराव पोळ ही दि. १७/०२/२०२५ रोजी लासूर स्टेशन (हरसूल सावंगी) ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाली. मयत नंदाबाई शंकरराव पोळ या शेतमजूर होत्या व अर्जदार यांना सरकारी योजनांचा लाभ मिळण्यासाठी मयत नंदाबाई शंकरराव पोळ यांच्या वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामासाठी आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे.

तरी सदरील जाहिर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मयत नंदाबाई शंकरराव पोळ यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत आपला आक्षेप या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा, मुद्दीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत नंदाबाई शंकरराव पोळ यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्दी नंतर येणार आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक                सहाय्क अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय व. स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४९७/२०२५                पुढील तारीख ०३/०९/२०२५

अर्जदार : १) यशोधरा राजेश नितनवरे, २) यश राजेश नितनवरे, ३) साक्षी राजेश नितनवरे, सर्व रा.आरापुर, ता.गंगापुर जि. औरंगाबाद ह.मु. सत्यम अपार्टमेंट, विनायक नगर, नवी सांगवी, पिंपळे गुरव, पुणे शहर

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.ए.एस.बर्वे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन मयत राजेश हरिश्चंद्र नितनवरे यांचा दि.२९/१२/२०२३ रोजी वोक्हार्ट रुग्णालय, अंबाजरी रोड उत्तर, शंकर नगर, नागपुर शहर, नागपुर येथे वैद्यकीय उपचारादरम्यान मृत्यु झाला आहे. मयत राजेश हरिश्चंद्र नितनवरे आणि अर्जदार नं. १ हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. २ व ३ यांचा जन्म झाला असुन मयतास अर्जदार नं. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना मौजे आरापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील शेत जमीन गट नं. ५१, एकुण क्षेत्र ७ हे. ७४ आर. मधील मयत राजेश हरिश्चंद्र नितनवरे आणि विजय सखाहरी गवई यांचे नावे असलेली ४० आर. क्षेत्रफळाची सामाईक जमीनीचे अनुषंगाने महसुल अभिलेखास नामांतरासाठी व तसेच शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी इेलरू ठशर्सीश्रीरींळेप -ीीं तखखख १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व

शिक्क्यानी आज दिनांक ३०/०७/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक                सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व.स्तर, गंगापुर सहायक

## अग्रलेख...

# 'दिव्य' यशाचे कौतुक करताना

ती खेळतेय बुद्धिबळाच्या पटावर... सभोवताली झगमगती रोषणाई, कॅमेऱ्यांचे फ्लॅश, जगभरातून जमलेले बुद्धिबळ स्पर्धक-विश्लेषक, श्वास रोखून बघत असलेले लोक आणि समोर एक अनुभवी प्रतिस्पर्धी. पण, तिच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेश नाही. ताण नाही. शांत आणि धारदार नजर. थेट पटावर. मन-बुद्धी पूर्णपणे खेळावर केंद्रित; बाहेरचे जग जणू तिच्या लेखी अस्तित्वातच नाही. तिच्या डोळ्यांत फक्त एक गोष्ट दिसत असते आणि ती म्हणजे विजयाची खात्री...आणि ती ठरते जगज्जेती! दिव्या देशमुख. नाव साधे आणि व्यक्तिमत्त्वही तसेच. बुद्धिबळाच्या पटावरील चाली मात्र असामान्य. नागपूरसारख्या शहरात वाढलेल्या दिव्याने जॉर्जियातील बटुमीत झालेल्या स्पर्धेत महिला बुद्धिबळ विश्वचषक जिंकला आणि तो जिंकणारी ती पहिली भारतीय महिला ठरली. तिने कोनेरू हम्पीला पराभूत केले आणि ग्रॅण्डमास्टर होणारी चौथी भारतीय महिला ठरली. अमरावती विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख यांची ही नात. जन्म-शिक्षण नागपूरचे. तिचे आई-वडील डॉक्टर आहेत. दोघांनीही दिव्याच्या माध्यमातून हे जगज्जेतेपदाचे स्वप्न पाहिले आणि कन्येने ते पूर्णत्वास नेले. त्यासाठी आई-वडिलांनी काय त्याग केला याची मोजदाद नाही आणि दिव्याने आरामाविना घालविलेल्या दिवसांची गणती नाही. दिव्या अवघी एकोणवीस वर्षांची आहे. एवढ्या कमी वयात बुद्धिबळासारख्या अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक खेळात जागतिक जेतेपद मिळविणे हे बहुतेकांसाठी दिवास्वप्नच. पण दिव्याने ते प्रत्यक्षात आणले. फिडे महिला वर्ल्ड कप जिंकणे हा एक स्पर्धा जिंकण्यापुरता विषय नव्हता. एका सामान्य घरातल्या मुलीचा संघर्ष, तिच्या कुटुंबाचा त्याग व जिद्द आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे भारतीय बुद्धिमत्तेची चुणूक पुन्हा एकवार जगाला दाखविण्याच्या ध्यासाची ती परिणती होती. दिव्याच्या पृष्ठभूमीला झगमगाट नाही. प्रायोजकांची रांग नाही आणि स्टारडमची झळाळीही नाही. तिच्याजवळ होता व आहे एक आत्मविश्वास- येस्स, मीच जिंकणार!...त्याच आत्मविश्वासाने तिला जगज्जेती केले. शाळा-महाविद्यालयात आणि कोचिंग क्लासेसना जाऊन अभ्यास नावाच्या औपचारिकतेची पूर्तता केली की विशीतल्या मुला-मुलींचे एक वेगळे विश्व असते. मित्र-मैत्रिणींसोबत भटकंती, खवय्येगिरी, सिनेमा-टीव्ही-गेमिंग, स्टेटस, रिल्स, सोशल मीडियावरील भंकस इत्यादी. त्यात दिव्या गुंतली नाही. ज्या नवथर अवस्थेत नैसर्गिक असे सगळे वागणे कुणीही गृहीत धरेल, अशा वयात तिने बुद्धिबळाच्या पटात स्वतःला गुंतविले. दिवस असो वा रात्र, मध्यरात्र असो वा पहाट, चेस हाच तिचा ध्यास होता.

दिव्याच्या यशात तिचे मार्गदर्शक, प्रशिक्षक या साऱ्यांचा वाटा आहेच. त्याहून मोठे योगदान तिच्या कुटुंबाचे आहे. तिच्या आई-वडिलांनी स्वतःच्या स्वप्नांना आवर घालून दिव्याच्या स्वप्नांची वाट प्रशस्त केली. अवघ्या पाच वर्षांची असताना तिला नागपुरातील एका बुद्धिबळ अकादमीत प्रशिक्षणासाठी पाठविण्याचा निर्णय पालकांनी घेतला. ही घटना २०१० ची. बुद्धिबळावरचे तिचे प्रेम वाढू लागले आणि २०१२ मध्ये ती पुद्दुचेरी येथे झालेल्या सात वर्षांखालील वयोगटाच्या राष्ट्रीय स्पर्धेत विजेती ठरली. २०१३ मध्ये दिव्या देशमुखने इराणमध्ये झालेल्या आशियाई स्पर्धेत विजेतेपद पटकावले. जेमतेम साडेआठ वर्षांची दिव्या २०१४ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील डर्बनमध्ये जागतिक स्पर्धेत विजेती ठरली. त्यानंतर तिने अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेतला आणि २३ सुवर्ण पदकांसह इतर पदकेही जिंकली. २०२० मध्ये ऑनलाईन चेस ऑलिम्पियाडमध्ये विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघात तिचा समावेश होता. २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय मास्टर, त्याच वर्षी दोनदा राष्ट्रीय महिला विजेतेपद, २०२४ मध्ये वीस वर्षे वयोगटाच्या जागतिक स्पर्धेत विजेतेपद आणि आता फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक अशी तिची देदीप्यमान कामगिरी. देशमुखांच्या घरात असलेले पोषक वातावरण अर्थातच तिच्या उपयोगी आले. तरीही असे मात्र म्हणता येते की, वातावरण कसेही मिळाले तरी व्यक्तीच्या इच्छाशक्तीवर बरेच काही अवलंबून असते. ती इच्छाशक्ती दिव्याच्या ठायी आहे. दिव्या तीन-चार वर्षांची असतानापासून चेस बोर्डवर रमायला लागली. तिची आवड पालकांनी हेरली आणि त्यानंतर तिने यशाचे अनेक सोपान पार करून आता ती जगज्जेती ठरली आहे. युरोपमधील अनेक देशांत, तसेच चीन-रशियासारख्या महाकाय राष्ट्रांत बुद्धिबळावर हजारो कोटींची गुंतवणूक होते. तिकडे या खेळाला मान-प्रतिष्ठा आहे. भारतात अद्याप घरातल्या मुलांसाठी बुद्धिबळ पट विकत घेणे हा प्राधान्याचा विषय नाही. सरकारकडून देखील या खेळाला फारसे पाठबळ नाही. शाळा-महाविद्यालयांमध्ये केवळ क्रिकेटवर भर असतो. प्रसारमाध्यमांचे लक्ष बुद्धिबळाकडे तेव्हाच वळते जेव्हा वर्ल्ड कपसारखे काहीतरी जिंकले जाते. म्हणजे त्या अर्थाने या खेळाला किमान भारतात तसे ग्लॅमर नाही. या पृष्ठभूमीवर दिव्याचे यश क्रांतिकारक ठरते. तिचे शहर नागपूर. नागपूरच्या मुलांची स्वप्ने आणि मुंबई-दिल्ली-बंगळुरूत राहणाऱ्या मुलांची स्वप्ने, त्यांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा व प्रोत्साहन यांत फरक असतो. ग्लॅमरचा फरक तर आहेच. शिवाय, महिलांच्या बुद्धिबळातील सहभागाबद्दल आपल्या समाजाची दृष्टी अद्याप पुरती सरावलेली नाही. अशात दिव्या देशमुखने जगातील अव्वल बुद्धिबळपटू म्हणून नाव कमावले हे कमालीचे सुखावणारे. दिव्याचे नाव आता फक्त महिला बुद्धिबळापुरते मर्यादित राहिलेले नाही. ते थेट भारतीय बुद्धिबळ क्रांती अर्थात् चेस रिव्होल्यूशनचा चेहरा बनले आहे. ही क्रांती दिव्याच्या रुपाने आरंभिली गेली आहे. आजही गावपातळीवर अनेक मुले बुद्धिबळ खेळताहेत. ती अजूनही सरकारी टॅलेंट स्कीमच्या बाहेर आहेत. ती अजूनही 'क्रिकेट नको, चेस हवंय' असं म्हणतात. पण त्यांचे ऐकून घेणारे कुणी नाही. दिव्याचे यश हे त्यांच्यासाठी आशा आहे आणि सरकार, समाज यांच्यासाठी दिशा देणारे देखील आहे. दिव्याच्या विजयाचे मोल असे की, तिने प्रकाशझोत स्वतःकडे वळविण्यासाठी कोणतीही खटपट केली नाही. ती स्वयंप्रकाशित झाली आणि देदीप्यमान कौशल्याने देशाचे नाव मोठे केले.

बुद्धिबळाच्या खेळाची काही वैशिष्ट्ये आहेत. कोणत्या वेळी आणि कोणत्या स्थितीत पुढे जायचे, कधी थांबायचे आणि कधी मागे यायचे याचे भान देणारा हा खेळ आहे. बुद्धिबळाच्या खेळाचा आरंभच भारतात झाला. हा खेळ भारतीय बुद्धिमत्तेच्या क्षमतेचे प्रतीक म्हणून शेकडो वर्षे जगाला ठावूक आहे. दिव्यासारख्यांचे पराक्रम जगाला या बौद्धिक क्षमतेची आठवण नव्याने करून देतात एवढेच. बुद्धिबळ या खेळाची ओळख बहुतेकजण काळ्या-पांढऱ्या चौकटींवर चालणारा डोक्याचा खेळ अशी करून देतात. पण या काळ्या-पांढऱ्या पटांवर घडणाऱ्या लढती किती बहुरंगी-बहुढंगी असतात, हे ज्यांनी हा खेळ मनापासून पाहिलाय, अनुभवलाय, समजून घेतलाय, त्यांनाच कळू शकते. दिव्या देशमुख नागपूरची असल्यामुळे नागपूर आणि विदर्भासाठी तिचे यश अभिमानास्पद आहेच. शिवाय, ती परदेशात खेळली व जागतिक विजेती ठरल्यामुळे महाराष्ट्रासह समस्त भारतीयांसाठी तिचे यश हा अभिमानाचा व आनंदाचा विषय आहे. त्यामुळेच पंतप्रधानांसह अनेक मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. आजच्या सोशल मीडियाच्या युगात व्हायरल व्हायचे म्हणून अनेकजण शॉर्टकटचा अवलंब करतात. अशा काळात दिव्याने ध्यास, सराव, संयम, सातत्य आणि चिकाटीचे महत्त्व दाखवून दिले. ही शिकवण आजच्या पिढीसाठी फार महत्त्वाची आहे. त्यामुळेच दिव्याचे हे यश साजरे करताना आपण केवळ तिचे कौतुक करून थांबू नये. तिच्यासारखी अनेक मुले चेसमध्ये नाव कमावण्याची स्वप्ने पाहत आहेत. दिव्याच्या घरच्यांनी तिला पाठबळ दिले. अनेक मुलांना घरून पाठबळ नाही. त्यांना जाणत्या व्यक्ती-संस्थांनी पाठबळ द्यावे. दिव्यासारख्या खेळाडूंना संधी, सुविधा आणि प्रेरणा देण्यासाठी यंत्रणा उभी करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. दिव्याच्या 'दिव्य' यशाचे कौतुक करताना असे प्रसंग भारतीयांच्या वाट्याला सतत यावेत, अशी कामना करूया आणि त्यासाठी प्रतिभावंतांना पाठबळ देऊया!

## विशेष

# व्यापार आणि बंदर विकासावर व्यूहात्मक भर

प्रा. सुखदेव बखळे

भारतात १३ प्रमुख बंदरे आणि दोनशेहून अधिक अधिसूचित लघु आणि मध्यवर्ती बंदरे आहेत. भारत हे जगातील सोळावे सर्वांत मोठे सागरी राष्ट्र आहे. पूर्व आशिया आणि अमेरिका, युरोप आणि आफ्रिकासारख्या ठिकाणांदरम्यान प्रवास करणारी बहुतेक मालवाहू जहाजे भारतीय सागरातून जातात. भारतातील प्रमुख आणि लघु बंदरे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारापैकी सुमारे ९५ टक्के व्यापार हाताळतात. बंदरांच्या बांधकाम आणि देखभालीशी संबंधित प्रकल्पांसाठी सरकारने स्वयंचलित मार्गाखाली शंभर टक्क्यांपर्यंत परकीय थेट गुंतवणुकीला परवानगी दिली आहे. भारताची प्रमुख बंदरे दरवर्षी ८२० एमएमटी माल हाताळत आहेत. त्यात २०१४ पासून ४७ टक्के वाढ झाली आहे. त्याच कालावधीमध्ये एकूण बंदर क्षमता दुप्पट होऊन १,६३० एमएमटी झाली आहे. २०४७ पर्यंत भारताची बंदर क्षमता सहा पटींनी वाढवण्याची योजना आहे. जवाहरलाल नेहरू बंदराने दहा दशलक्ष टीईयूड (२०-फूट समतुल्य युनिट) कंटेनर हाताळणी क्षमता प्राप्त केली आहे. जागतिक बँकेच्या 'लॉजिस्टिक्स परफॉर्मन्स इंडेक्स' (एलपीआय) अहवाल २०२३ नुसार, भारत 'आंतरराष्ट्रीय शिपमेंट' श्रेणीमध्ये २२ व्या क्रमांकावर आहे. २०१८ मध्ये तो ४४ व्या स्थानावर होता. कंटेनर उभे राहण्याचा वेळ आता तीन दिवसांपर्यंत कमी झाला आहे. जहाजांच्या टर्नअराऊंड वेळेत ०.९ दिवसांपर्यंत सुधारणा झाली आहे. जागतिक बँकेच्या 'कंटेनर पोर्ट परफॉर्मन्स इंडेक्स'मध्ये नऊ भारतीय बंदरे आहेत. विशाखापट्टणम् जागतिक स्तरावर टॉप २० मध्ये आहे. प्रमुख बंदरांमधील कार्यरत पीपीपी प्रकल्पांचे मूल्य २०१५ मध्ये सुमारे १६ हजार कोटी रुपये होते. २०२२-२३ मध्ये ते ४० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे.

मोठ्या बंदरांमध्ये तंत्रज्ञानाशी संबंधित समस्या आणि अपुऱ्या पायाभूत सुविधा आहेत. तिथे पुरेसे बर्थ किंवा जहाजांसाठी पुरेशा लांबीचे प्लॅटफॉर्म्स उपलब्ध नाहीत. पूर्व किनाऱ्यावरील आणि मन्नारच्या आखाताजवळ जास्त गाळ साचण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांची क्षमता कमी होते. जागतिक दर्जाची मेगा बंदरे, ट्रान्सशिपमेंट हब आणि बंदर पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करून भारताच्या सागरी क्षेत्राच्या वाढीला गती देण्यावर सरकारने भर दिला आहे. भारताच्या ७,५०० किलोमीटर लांबीच्या किनारपट्टीचा वापर करून १४,५०० किलोमीटर संभाव्य जलमार्ग तयार करणे आणि प्रमुख आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारमार्गांवर धोरणात्मक स्थान वापरून देशात बंदर नेतृत्व विकासाला चालना देणे ही सरकारची उद्दिष्टे आहेत.



आज मोठ्या प्रमाणात माल हाताळण्याची क्षमता वाढवून, बर्थिंग सुविधा, साठवणूक आणि हाताळणी क्षमता सुधारून बंदरांचा विस्तार आणि आधुनिकीकरण करण्याची गरज आहे. ऑपरेशन्स वाढवण्यासाठी आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी स्वयंचलित क्रेन, रोबोटिक सिस्टिम आणि स्मार्ट पोर्ट मॅनेजमेंट सिस्टिमसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर विचारात घेतला पाहिजे.

गतिमान आणि चांगले रस्ते आणि रेल्वे नेटवर्कद्वारे बंदरे आणि अंतर्गत प्रदेशांमधील कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. 'ब्लॉकचेन', 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' (आयओटी) आणि डेटा ॲनालिटिक्ससारख्या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीमुळे बंदर कामकाजात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि सुरक्षितता वाढू शकते. इलेक्ट्रॉनिक दस्तावेजीकरण, कंटेनर ट्रॅकिंग आणि कार्गो क्लिअरन्स यासारख्या प्रक्रियांचे ऑटोमेशन कागदपत्रे, विलंब आणि मानवी चुका कमी करण्यास मदत करू शकते. बंदर पायाभूत सुविधा विकासाशी संबंधित नियामक प्रक्रिया, परवानग्या आणि मान्यता सुलभ आणि सुलभ केल्याने गुंतवणूक आकर्षित होऊ शकते आणि प्रकल्प अंमलबजावणीला गती मिळू शकते. एक कार्यक्षम नियामक चौकट गुंतवणूकदारांना निश्चितता प्रदान करू शकते आणि बंदर क्षेत्रात व्यवसाय सुलभतेला प्रोत्साहन देऊ शकते. पायाभूत सुविधा आणि व्यवसाय सुलभतेला एकाच वेळी प्रोत्साहन दिल्यास बंदर अर्थव्यवस्था पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचते. गेल्या दहा वर्षांमध्ये सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी)द्वारे, सरकारने धोरणात्मक सुधारणा आणि नवीन तंत्रज्ञानाचा समावेश करून भारताच्या बंदरांना जागतिक मानकांनुसार श्रेणीसुधारित करण्याचे प्रयत्न केले आहेत.

सध्या महाराष्ट्रात दोन प्रमुख बंदरे आहेत. यातील एक म्हणजे मुंबई बंदर आणि दुसरे जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट बंदर; मात्र मुंबई शहराचा विकास आणि काही भौगोलिक कारणांमुळे 'जेएनपीटीए' बंदरातून अधिकची वाहतूक करणे शक्य नाही. तसेच 'जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट'ची कंटेनर हाताळण्याची क्षमताही संपत चालली आहे. देशातील निर्यात व आयातक्षेत्रात होणारी वाढ पाहता भविष्यात दुसऱ्या बंदराची गरज लागू शकते. त्यामुळेच पालघर जिल्ह्यातील वाढवण परिसरात एक नवीन बंदर उभारण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य सागरी मंडळ आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट या दोन संस्था एकत्र काम करत आहेत. वाढवण बंदर जगातील दहा मोठ्या बंदरांपैकी एक असणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील आर्थिक विकासाला चालना मिळणार असून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा तब्बल बारा लाख रोजगारांची यानिमित्ताने निर्मिती होईल. वाढवण बंदराचे काम जेएनपीटी आणि महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्या संयुक्त भागीदारीतून केले जाणार आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च ७६,२२० कोटी रुपये आहे. यामध्ये केंद्र आणि राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ७४ आणि २६ टक्के असा असणार आहे. यात 'पीपीपी'नुसार मुख्य पायाभूत सुविधा, टर्मिनल आणि इतर व्यावसायिक पायाभूत सुविधांचा समावेश असेल.

बंदराच्या पायाभूत सुविधांमध्ये प्रत्येकी एक हजार मीटर लांबीचे नऊ कंटेनर टर्मिनल, चार बहुउद्देशीय बर्थ, चार लिक्विड कार्गो बर्थ, एक रो-रो बर्थ, एक कोस्टल कार्गो बर्थ आणि एक कोस्ट गार्ड बर्थ यांचा समावेश आहे. या प्रकल्पामध्ये ऑफशोअर क्षेत्रात १,४४८ हेक्टर क्षेत्र पुनर्संचयित करणे आणि १०.१४ किलोमीटर ब्रेकवॉटर, कंटेनर/कार्गो स्टोरेज क्षेत्रांचे बांधकाम समाविष्ट आहे. या प्रकल्पामुळे रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील. तसेच स्थानिक मत्स्यव्यवसाय करणाऱ्या आणि या व्यवसायाशी संबंधित असलेल्या सर्व घटकांचे पुनर्वसन करून योग्य तो मोबदला देण्यात येणार आहे. वाढवण विकास केंद्राचे क्षेत्र, त्यातील गावांची संख्या वाढवून वाढवण विकास केंद्राच्या माध्यमातून वाढवण पोर्ट सिटी अर्थात चौथी मुंबई वसवण्याच्या दृष्टीने 'एमएसआरडीसी'ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्याची मागणी केली गेली होती. क्षेत्र, गावे वाढल्याने आता वाढवण विकास केंद्रांतर्गत वाढवण बंदरालगत आंतरराष्ट्रीय दर्जाचे नवीन शहर अर्थात 'पोर्ट सिटी' वसवण्यात येणार आहे. आता वाढवण विकास केंद्राची विकास योजना तयार करण्याच्या, चौथ्या मुंबईचा आराखडा तयार करण्याच्या कामाला 'एमएसआरडीसी'कडून सुरुवात होणार आहे तर अधिसूचित क्षेत्राचे सर्वेक्षण आणि इतर प्रकारच्या अभ्यासालाही सुरुवात केली जाईल. वाढवण बंदर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे बंदर म्हणून प्रस्तावित असल्याने त्याला आनुषंगिक रस्त्याचे नियोजन, वाहतूक, उद्योग, कंटेनर डेपो, लॉजिस्टिक पार्क उद्योगाचे नियोजन इत्यादींचाही विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. त्यानुसार 'एमएसआरडीसी'कडून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सर्व सोयी-सुविधांचा विकास करण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. समृद्धी महामार्ग, बुलेट ट्रेन, विमानतळ आदी सुविधांनी युक्त चौथी मुंबई या बंदरालगत आकाराला येणार आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

गिरीश शेरेकर

# देवेंद्र फडणवीसांचा स्पष्ट संदेश

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या प्रत्यक्ष रणधुमाळीला आणखी काही महिने अवधी असला तरी पडघम मात्र जोरात वाजायला लागले आहे. त्याचाच एक भाग म्हणून भाजपाची विदर्भ विभागाची नियोजन बैठक नुकतीच वर्धेत झाली. निवडणूक कोणतीही असो भाजपा ती संपूर्ण तयारीने लढते आणि कार्यकर्त्यांना त्यासाठी व्यवस्थित तयार करते. सूक्ष्म नियोजन व त्यानुसार पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी प्रमाणिक काम केले तर यश हमखास मिळते यावर भाजपाचा पूर्ण विश्वास आहे. याच पद्धतीने त्यांनी निवडणुका लढल्या व जिंकल्या आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात चांगले यश मिळविण्यासाठी भाजपाने आवश्यक ती सर्व तयारी केली होती. भाजपाला भरीव यश मिळेल असे अंदाजही वर्तविले जात होते. पण, ती निवडणूक अचानक विरोधकांनी तयार केलेल्या चुकीच्या विमर्श भोवती फिरली. महाराष्ट्रातील निवडणूक संपेपर्यंत वेगवेगळे खोटे विमर्श चर्चेत राहिले. त्याचा थेट परिणाम निकालावर दिसला. भाजपाला त्यातून मोठा धडा शिकायला मिळाला. खोट्या विमर्शाची विधानसभेत पुनरावृत्ती होऊ नये म्हणून भाजपाने अशी काही तयारी केली की, २०१९ निवडणुकीचा आपलाच विक्रम मोडत १३२ जागा जिंकण्याचा नवा विक्रम केला. गेल्या ४० वर्षांत महाराष्ट्रात कोणत्याही एका पक्षाला इतक्या जागा मिळालेल्या नाहीत. महायुती म्हणून जागांची संख्या २३२ झाली. जनतेने व्यक्त केलेला हा विश्वास येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत कायम ठेवण्याचे आव्हान आता भाजपासमोर आहे.

विधानसभेतल्या भरघोस यशासाठी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे कौतुक करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धेच्या नियोजन बैठकीत स्पष्ट सूचना व संदेश दिले आहेत. कोणत्याही स्थितीत अतिआत्मविश्वासात न जाता तयारी करा. केंद्र व राज्य सरकारच्या कामामुळे भाजपासाठी समाजात खूपच अनुकूलता आहे. लोक आपल्याला निवडून द्यायला तयार आहेत. पण, हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा अनेक जिल्ह्यांमधले स्थानिक पातळीवरच्या नेत्यांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये असलेले छोटे-छोटे वाद संपुष्टात येतील. एकमेकांचे पाय ओढण्याची वृत्ती नष्ट करावी लागेल. भाजपा परिवार आहे. दोन भावांमध्ये थोड्या कुरबुरी असतातच. परंतु, निवडणुकीच्या तोंडावर एकत्रित राहून वादांवर पडदा टाकला पाहिजे. तो टाकला नाही म्हणून अनेक पक्षांचे पतन झाले आहे. असा प्रकार आपल्या पक्षात होता कामा नये. जो करेल त्याला पक्ष त्याची जागा दाखवेल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. हे सांगतानाच त्यांनी महायुती म्हणूनच निवडणुका लढण्याचा प्रयत्न राहील. जिथे अडचणी असेल तेथे चर्चा करून निर्णय घेतले जातील. अशा ठिकाणी वेगळे लढण्याचा निर्णय जरी झाला तरी महायुतीतल्या घटक पक्षांवर टीका करायची नाही, अशी ताकीद त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिली. समन्वयाने निवडणूक लढून भाजपाला विदर्भात गत निवडणुकीपेक्षा जास्त म्हणजेच २ हजाराच्यावर जागा जिंकायच्या आहेत. भाजपाच मोठा पक्षा राहील याची काळजी सर्वांना घ्यायची असल्याने प्रत्येकाने झोकून काम करण्याचे आवाहन त्यांनी पोटतिडकीने केले.

देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात अधोरेखित केलेला प्रत्येक मुद्दा वास्तव स्थितीला धरून आहे. केंद्र व राज्यात भाजपा सत्तेत असल्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्ते हरखून जाण्याची शक्यता आहे. त्यांना भानावर आणण्याचे अतिशय महत्त्वाचे काम निवडणूक तयारीच्या सुरुवातीलाच त्यांनी केले आहे. अलिकडच्या काळात अनेक जिल्हास्थानांवर भाजपात हेवेदावे सुरू झाले आहे. याची संपूर्ण माहिती पक्षाकडे गोळा झाल्यामुळेच फडणवीसांनी अतिशय स्पष्टपणे अंतर्गत वादांवर भाष्य केले असावे. पक्षातले वातावरण कोण खराब करत आहे, त्यांची नावे जिल्हानिहाय त्यांच्याकडे असू शकतात. कदाचित त्या नावांसमोर 'मार्कर पेन'ने रेष देखील ओढली असेल. भाजपाच्या यशात ही मंडळी जर अडसर ठरत असल्याचे लक्षात आले तर त्यांचे राजकीय अस्तित्व धोक्यात येऊ शकते. या मंडळींनी वेळीच सतर्क होण्याची गरज आहे. कारण, भाजपाला कोणताही धोका पत्करण्याची इच्छा नाही. संघटनशक्तीला नख लावणारे भाजपा खपवून घेत नाही, हा इतिहास आहे. दुसरीकडे कामात प्रामाणिक व पक्षवाढीसाठी कठोर मेहनत करणाऱ्यांच्या भाजपा नेहमीच पाठीशी असते. त्यांना योग्य पद आणि प्रतिष्ठा देते, हे वेळोवेळी सर्वांनीच पाहिले आहे. पक्षाचा हा स्वभाव लक्षात घेऊन सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काम करून पक्षाला व स्वतःला मोठे करावे, अशी अपेक्षा आहे. पक्षाच्या या अपेक्षेवर किती जण खरे उतरतात हे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक रणधुमाळीत व निकालानंतर स्पष्ट होईलच.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता - सांख्ययोग

प्रा. दिलीप जोशी

श्रीमद्भगवद्गीतेचा दुसरा अध्याय सांख्ययोग म्हणून परिचित आहे. पहिल्या अध्यायात मोहग्रस्त झालेला अर्जुन दुसऱ्या अध्यायात सहाव्या श्लोकापर्यंत विषादयोगात आहे. त्यानंतर भगवान श्रीकृष्ण सव्यसाची धनंजयाला जे तत्त्व विशद करतात त्याला सांख्ययोग म्हणतात.

सांख्य तत्त्वाचे प्रणेते श्री. कपिल महामुनी आहेत. श्रीगीतेच्या दहाव्या अध्यायात स्वयं भगवान म्हणतात ''सिद्धानां कपिलो मुनि:'' सिद्धांमध्ये मी कपिल महामुनी आहे. हा अधिकार कपिल महामुनींचा आहे. त्यांनी आपले वडील कर्दम ऋषी वनात निघून गेल्यावर, आपली आई देवहुती यांना सांगितलेला उपदेश जो पुढे कपिलगीता नावाने प्रसिद्ध आहे. तोच सांख्ययोग आहे.

सांख्य शब्दावरून तो संख्येशी संबंधित असावा हे अनुमान आपल्याला काढता येईल. एक, दोन, तीन अशा असंख्यापर्यंत पोचणाऱ्या गणक अंकांना आपण संख्या म्हणतो. सांख्य म्हणजे गणना करणे, मोजणे, संख्यात्मक गणनेद्वारा तर्क करणे. सांख्ययोगात शास्त्रोक्त, नियमानुसार आणि यथार्थ गणना अपेक्षित आहे. कपिल महामुनींनी आपली आई देवहुतीला सांगितलेल्या सांख्यमतानुसार त्यांनी एकूण पंचवीस तत्त्वे सांगितली. या तत्त्वांची पद्धतशीर गणना करणे यालाच संख्याक्रम म्हणतात. त्या तत्त्वांना सांख्य म्हणतात. सांख्यमतानुसार जगाची निर्मिती दोन तत्त्वांवर झाली. त्यातील एक आहे प्रकृती आणि दुसरा आहे पुरुष. दोन्ही तत्त्वे आपल्यातच आहेत. प्रकृती म्हणजे भौतिक तत्त्व ज्याला सोप्या भाषेत संसार. पुरुष म्हणजे आत्मा म्हणजे परम् तत्त्व.

गणना म्हणजे सांख्यतत्त्वात प्रकृतीचे एकूण २४ घटक आहेत. मन, बुद्धी, अहंकार, पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, पंच तन्मात्रा (रूप, रस, गंध इत्यादी), पंच महाभूते असे एकूण २३ आणि प्रत्यक्ष प्रकृती असे एकूण २४ घटक आणि दुसऱ्या बाजूला आत्मा असे पंचवीस घटक. या २५ घटकांची सांख्यिकी किंवा क्रमनुसार गणना म्हणून हा सांख्ययोग.

सांख्ययोग द्वैत सांगतो म्हणजे प्रकृती वेगळी आणि पुरुष म्हणजे आत्मा वेगळा. आपण स्वतःला प्रकृतीपासून वेगळे होण्याचा सतत प्रयास करणे म्हणजे संसारात राहून त्याच्या बंधनात न राहणे कारण संसार नश्वर आहे. दुसऱ्या बाजूला आत्मा अमर आहे. आपण त्या आत्मतत्त्वाची अनुभूती घेण्यासाठी सतत प्रयत्नशील असावे. या अर्थाने सांख्य द्वैत सांगतो. असे असले तरी तो पराकोटीचा अद्वैत सांगतो असे माझे मत आहे. म्हणूनच सांख्ययोग सर्वांत श्रेष्ठ योग आहे. मी तर म्हणतो सांख्ययोगातच सर्व योग सामावले आहेत. म्हणून सांख्ययोगाला ज्ञानयोग असेही म्हटले आहे.

**ज्ञानं च लोके यदिहास्ति किंचित् सांख्यागतं तच्च महन्महात्मन् !**

या जगात जे ज्ञान आहे ते सांख्यमतातूनच आले हे व्यास महर्षी सांगतात.

सांख्ययोग फक्त श्रीगीतेतच आहे असे मानण्याचे कारण नाही. भागवत महापुराणात खुद्द कपिल महामुनींनी आपली आई माता देवहुतीला, भगवान गोपालकृष्णाने उद्धवाला, अष्टावक्र महामुनींनी राजा जनकाला हाच योग सांगितला.

श्रीगीतेत दुसऱ्या अध्यायाला सांख्ययोग म्हटले असले तरी तिसऱ्या अध्यायात तिसरा श्लोक, पाचव्या अध्यायात चौथा आणि पाचवा, तेराव्या अध्यायात श्लोक एकोणवीस ते तेवीस सांख्ययोगाचा उल्लेख ज्ञान संक्रमणासाठी आहे. अनेकांना असे वाटते की सांख्ययोग निरीश्वरवाद सांगतो का? पण हे चूक आहे. सोप्या भाषेत समजून घेऊ. कर्मयोग, भक्तियोग असे सर्व योग त्या परम तत्त्वापर्यंत पोचण्यासाठीचा मार्ग सांगतात .त्यावर मार्गक्रमण करण्याचा सल्ला देतात. सांख्यमत या सर्वमार्गांचा अर्क आहे. कारण सांख्यमतानुसार मी च परमात्मा आहे. इतर योग ज्याच्यापर्यंत पोचायचे त्यासाठी चालायला सांगतात. सांख्य मतानुसार जिथे जायचे तेच माझ्यात आहे तर मार्गक्रमण कसले?

जर ते परमात्म तत्त्वच माझ्यात आहे तर तुम्ही फक्त त्याची अनुभूती घ्या. तुमच्यातले भाव जागरण करा. ही स्व ची ओळख सांख्यमत सांगते. म्हणून हे मत निरीश्वरवादी नाही.

सांख्यज्ञानालाच भगवंतांनी आत्मज्ञान अर्थात ज्ञानयोग म्हटले आहे. भौतिक जगतात गुंतून केलेली कर्मे ही खऱ्या अर्थाने कर्म नसून कर्म हे चित्तशुद्धीचे साधन असावे. हा कर्मयोग भगवंताला अपेक्षित आहे. आपण ज्याची सतत चिंता करतो ते संसार तत्त्व वास्तव नाही तर आत्मा हा शाश्वत आहे. ''ब्रह्म सत्य जगन्मिथ्या'' या तत्त्वाने प्रकृती आणि पुरुष मांडताना भगवान उदाहरण देऊन स्पष्ट सांगतात की-

**वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।**

हे सांख्यमत श्रीगीता मांडते.

विस्तारभयाने केवळ दुसऱ्या अध्यायात सांख्यमत मांडताना भगवंतांनी जे सांगितले ते लक्षात घेतले की सांख्यमताचा परिचय होईल.

१) नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
२) अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।
३) हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
४) सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
५) कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
६) तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥

असे परिचित श्लोक अध्याय दोन मध्ये आहेत. त्यानिमित्ताने सर्वांनी श्रीमद्भगवद्गीता वाचून या श्लोकांचा अभ्यास केल्यास हितावह ठरेल.

ग्रंथश्रेष्ठ ज्ञानेश्वरी मध्येदेखील खूप सुंदर विवेचन माउलींनी केले आहे.

१) उपजे ते नाशे, नाशिले ते पुनरपि दिसे ।
२) जैसे जिर्ण वस्त्र सांडिजे, मग नूतन वेढीजे ।

थोडक्यात, सांख्ययोगाच्या निमित्ताने भगवंत अर्जुनाला सांगतात की, प्रकृतीमध्ये म्हणजे संसारसागरात गुंतून न राहता त्या परमात्म तत्त्वासाठी या मोहमायेतही स्थितःप्रज्ञ रहा.

**प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।**
**आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ।**

म्हणजे ज्यावेळी पुरुष मनातील सर्व कामनांचा त्याग करून आत्मानुभूतीने आत्मस्वरूपात संतुष्ट होतो. या अवस्थेला स्थितःप्रज्ञ अवस्था म्हणतात. थोडक्यात उच्च अर्थाने उसात जाऊन पाचोळा अंगाला लागू न देणे अर्थात संसारात असलो तरी संसार अंगाला लागू न देणे आणि त्या आत्मतत्त्वाची अनुभूती घेणे. सांख्यमत याहून वेगळे नसावे!

९८२२२६२७३५

## हुंड्याचे नवे अवतार आणि आपण

देशात हुंडाबंदी कायदा लागू होऊन ६४ वर्षे पूर्ण झालीत. पण हुंड्यासाठी होणारा महिलांचा छळ, मानसिक यातना, तिच्या माहेरची आर्थिक पिळवणूक यातून दरवर्षी होणाऱ्या हजारो आत्महत्या हे वास्तव आपण बदलू शकलो नाही ही शोकांतिकाच आहे. महाराष्ट्र तशी साधू संतांनी व महापुरुषांनी वैचारिक मशागत केलेली भूमी. पण आपल्या राज्याची स्थितीही याबाबत भूषणावह नाही. त्यासाठी आता बोलक्या सुधारकांपेक्षा कर्त्या सुधारकांची नितांत गरज आहे.

अर्धशिक्षित, गरीब व मध्यम वर्गात हा छळवाद आहेच. पण उच्चभ्रू व मध्यम वर्गातही या ना त्या प्रकारे वधूपक्षाचे शोषण होतच असते. आधी फक्त रोख, दागिने अथवा वस्तुरूपात हुंडा घेतला जायचा. आता त्या जोडीला हुंड्याचे काही नवे अवतार अवतरले आहेत. लग्नासाठी आलिशान सभागृह, रिसॉर्ट, प्री वेडिंग शूटिंग, फिल्मी आतषबाजी, संगीत मैफिल, सुरुचीचा थाटमाट या साऱ्यांची अपेक्षा मुलीच्या बापाकडूनच केली जाते. जमलेच तर हनीमून टूरचा खर्चही मुलीच्या वडिलानेच करायचा. काही नवरोबा चलाखी करतात. भारतीय विवाह हा एक संस्कार आहे. पण कुप्रथाच जिथे फॅशन बनून नव्या नव्या अवतारात थैमान घालत असेल तिथून संस्काराने पलायन केलेले असते. राजकीय थाटमाट ही एक नवीच विकृती विवाह सोहळ्यात धुडगूस घालत आहे. कहर म्हणजे आपल्या कुटुंबातील मुलाने हुंडा घ्यावा म्हणून आग्रही असणाऱ्या महिला. ज्या कुटुंबात हुंडा घेतला जातो तिथे हुंडा घेणाऱ्या मुलाला विरोध करणारी आई किंवा बहीण अपवादानेच मिळणार. उलट ज्या कुटुंबात हुंडा न घेण्याची परंपरा आहे ती पुरुषांनीच प्रस्थापित केलेली आपल्याला बघायला मिळते हे वास्तव आहे. हुंडाबळी व सासरी होणाऱ्या स्त्री शोषणासाठी भोगवादी पुरुषी मानसिकता कारणीभूत आहेच पण सासरच्या छळगुन्ह्यांत स्त्री आरोपींचा सहभागही वरचढ असेल तर स्त्रियांनीही अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे. वाजंत्रीचा खर्च मुलीच्या बापाकडून वसूल केलेला असेल तर अशा वरातीत बॅण्डच्या तालावर थिरकणाऱ्या महिलाही तेवढ्याच दोषी आहेत. आपल्याच छळाच्या अशा उत्सवात महिलांनी का म्हणून मिरवावे? माझा छळ झाला तसा मी माझ्या सुनेचा होऊ देणार नाही, ही माझी सून तशी ती कुणाची मुलगीही आहे; हा स्त्रीस्नेहवादच हजार सुधारणावादापेक्षा रामबाण आहे. घरच्या पुरुषांकडून सुनेला माहेरून पैसे आण अशी मागणी करून त्रास दिला जात असेल तर कुटुंबातील महिलांनी त्यास का विरोध करू नये? तसे होत नसेल तर त्यात महिलाही अप्रत्यक्षपणे सहभागीच असतात. केवळ पुरुषांनाच दोष देण्यापेक्षा महिलांनीही आपल्या मुलाने, भावाने, दिराने हुंडा घेऊ नये, नव्या थाटमाटांचा आग्रह धरू नये यासाठी कुटुंबात निर्भीडपणे आपली मते मांडण्याची गरज आहे.

**किशोर उरकुंडवार**/९९२१२६३०६२

## वाचक पत्रे

## साध्या जीवनात परमानंद

साधेपणातच खरी शांती, समाधान आणि आनंद असतो. जेव्हा आपण जीवनातल्या फालतू गोंधळातून, अपेक्षांमधून आणि भौतिक हव्यासातून मोकळे होतो, तेव्हा आपण खऱ्या अर्थाने जगायला लागतो. जेव्हा आपण आपल्या गरजा, अपेक्षा आणि इच्छांना मर्यादित ठेवतो, तेव्हा आयुष्य हलकं वाटतं. साधं जीवन म्हणजे जे आहे त्यात आनंद मानणे भौतिक स्पर्धेपेक्षा अंतर्गत शांततेला महत्त्व देणे. अनावश्यक गोष्टींच्या ओझ्यापासून मुक्तता खरे समाधान, जेव्हा आपण बाह्य गोष्टींपेक्षा अंतर्गत मूल्यांना प्राधान्य देतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण आयुष्य जगायला लागतो. साधं जीवन म्हणजे फक्त भौतिक वस्तूंच्या मागे न लागता, आपल्या गरजांनुसार जगणे आणि त्यातही समाधान मानणं म्हणजेच खरे सुख. कारण आपल्याकडे काय नाही याकडे बघत राहिलो, तर दुःखच वाटतं; पण जे आहे त्यात आनंद शोधला, तर मन शांत राहतं आणि आयुष्य सुखी होतं.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## ऑपरेशन महादेवअंतर्गत भारतीय सेनेचे तांडव

धर्म विचारून आमच्या बहिणींचे कुंकू पुसणाऱ्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यातील पाकिस्तानी दहशतवाद्यांना भारतीय सेनेने श्रावणाच्या पहिल्याच सोमवारी ठार केले. ऑपरेशन महादेव अंतर्गत जम्मू-काश्मिरातील पहाडी भागात भारतीय सेनेने अक्षरशः तांडव करत तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांना ठार केले. आज खऱ्या अर्थाने भारतीय सेनेने पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. या दहशतवाद्यांना पाताळातूनही शोधून काढू हे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशवासीयांना दिलेले वचन पूर्ण केले. भारत-पाकिस्तान युद्धसंघर्ष स्थगित झाल्यानंतर अमेरिकेच्या दबावाखाली पंतप्रधान नरेंद्र मोदींनी युद्ध थांबवल्याचे विरोधक बोलत होते. पण भारतीय सेनेने पहलगाम हल्ल्यानंतर ९६ दिवसांत या दहशतवाद्यांना यमसदनी धाडले आणि पुन्हा एकदा जगास ठणकावून सांगितले की भारत से पंगा लिया तो यही हाल होगा. यामध्ये यापेक्षाही अधिक यश येण्याची शक्यता भारतीय सेनेने वर्तवली आहे. भारतीय सेनेच्या महादेव पराक्रमाने प्रत्येक भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून यावा अशीच ही घटना आहे. अभिमान आहे आम्हास भारतीय सेनेच्या शौर्याचा.

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### नीट परिक्षेत कमी गुण मिळाल्याने आत्महत्या

**परभणी,दि.३०(प्रतिनिधी) :** परभणी शहरातील गजानन नगर भागातील ऋषिकेश शिंदे नामक २० वर्षीय युवकाने नीट परिक्षेत कमी गुण मिळाल्याने नैराश्यातून गळफास घेऊन आत्महत्या केली. या दुर्देवी घटनेबद्दल नवा मोंढा पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

### कारच्या धडकेत एकाचा मृत्यू, एक जखमी : यशवाडी फाट्याजवळील घटना

**परभणी,दि.३०(प्रतिनिधी) :** भरधाव वेगाने जाणाऱ्या एका कारने दिलेल्या धडकेत काशिनाथ गायकवाड यांचा मृत्यू झाला. तर मालनबाई संजय जाधव या जखमी झाल्या.

तुळशीराम काशिनाथ गायकवाड यांनी मानवत पोलिस ठाण्यात २८ जूलै रोजी तक्रार दाखल करीत २३ जूलै रोजी रात्र नऊ वाजेच्या सुमारास घडलेल्या घटनेची माहिती दिली. त्यांचे वडील काशिनाथ गायकवाड व बहिण मालबाई जाधव हे दोघे मानवत रोड येथील चुलत्याला भेटण्याकरीता एम.एच.२२ क्यू. ९१२२ या दुचाकीने जात होते. ताडबोरगांव शिवारात यशवाडी फाट्याजवळ रात्री नऊ वाजेच्या सुमारास एम.एच. २८ व्ही. ८८२५ क्रमांकाच्या वाहनाने जोरदार धडक दिली. त्यात दोघे गंभीर जखमी झाले. त्यात गायकवाड यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला, असे नमूद केले.

### सोन्या-चांदीच्या दागिण्यासह १६ लाखाचा मुद्देमाल लंपास

**परभणी,दि.३०(प्रतिनिधी) :** पालम तालुक्यातील कापशी येथील नामदेव जाधव यांच्या घरातून अज्ञात चोरट्यांनी चॅनलचे गेट व दरवाजाचे कुलूप तोडून सोन्या चांदीचे दाग दागिणे व रोख २ लाख १२ हजार रुपये असा एकूण १५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. दरम्यान, या प्रकरणात पालम पोलिसांनी चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला असून उपविभागीय पोलिस अधिकारी समाधान पाटील यांनी या घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

### पेट्रोल पंपावरील कार्यालयातून दोन लाख रुपयांची रक्कम लंपास : चोरटे सीसीटीव्हीत कैद

**परभणी,दि.३०(प्रतिनिधी) :** जिंतूर ते औंढा या रस्त्यावरील श्री समर्थ पेट्रोल पंपाच्या कार्यालयातून अज्ञात चोरट्यांनी २ लाख रुपये रोकड असणारी बॅग लंपास केली. दरम्यान, या प्रकरणात गजानन जगताप यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे तीन अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, जिंतूर पोलिसांनी या प्रकरणात सीसीटीव्ही तपासून चोरट्यांचा मागोवा घ्यावयास सुरुवात केली आहे.

### कडसावंगी येथील महिलेचा सर्पदंशाने मृत्यू

**परभणी,दि.३०(प्रतिनिधी) :** जिंतूर तालुक्यातील बोरी जवळील कडसावंगी येथील मीना पांडुरंग पूर्णे या ४० वर्षीय महिलेचा झोपेतच सर्पदंश झाल्याने मृत्यू झाला. दरम्यान, या प्रकरणात बोरी पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद घेतली आहे.

### अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त १०१०५ मोतीचूर लाडूंचे वाटप होणार

लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने आयोजन

**परभणी,दि.३०(प्रतिनिधी) :** साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा व लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने १० हजार १०५ मोतीचूर लाडू वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

१ ऑगस्ट रोजी परभणी बसस्थानक परिसरातील डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळा परिसरात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते होणार आहे, तर अध्यक्षस्थानी भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे हे असणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, भाजपा महानगराध्यक्ष शिवाजी भरोसे, तसेच लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष व भाजपा अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश सरचिटणीस राधाजी शेळके यांची उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमासाठी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे परभणी ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवाजी शेळके, काशिनाथ गायकवाड, दिलीप सावळे, दिगंबर आगलावे यांनी केले आहे.

### गंगाखेडात मतदार यादी पुनरिक्षणासाठी प्रशिक्षण कार्यशाळा

मतदार यादीतील अचूकता व पारदर्शकतेवर भर

**परभणी,दि.३०(प्रतिनिधी) :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार गंगाखेड विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादी विशेष पुनरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत गंगाखेड येथे सर्व मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसाठी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेला उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी जिवराज डोंगर, तहसीलदार श्रीमती उपाध्ये, गटविकास अधिकारी थेटे आदींसह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या विशेष प्रशिक्षणामध्ये नवमतदार नोंदणी, मृत अथवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे, नावांमध्ये सुधारणा या बाबींसह मतदार यादीतील अचूकता व पारदर्शकता सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आला. बूथ लेव्हल ऑफिसर यांना घरोघरी जाऊन माहिती संकलन, पात्र मतदारांची नोंदणी, मतदारांशी संवाद आदी कार्यपद्धतींचे मार्गदर्शन करण्यात आले.यादीतील त्रुटी दूर करून अधिकाधिक पात्र मतदारांची नोंदणी सुनिश्चित करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून विशेष प्रयत्न सुरू आहेत.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# अंबरवाडी येथे कापूस उत्पादकांसाठी प्रभावी शेती शाळा संपन्न

## जिंतूर- कृषि विभागाकडून घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर/प्रतिनिधी-** अंबरवाडी येथे कापूस उत्पादकांसाठी प्रभावी शेती शाळा संपन्न झाली आहे.

दरम्यान दि. ३० जुलै २०२५ मौजे अंबरवाडी येथे कृषी विभागामार्फत तालुका कृषी अधिकारी श्री नितीन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री तुळशीराम घुगे यांच्या शेतात प्रभावी शेती शाळा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमात गावातील कापूस उत्पादक शेतकरी बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. या शेती शाळेत सहाय्यक कृषी अधिकारी श्री गजानन राठोड यांनी कापूस पिकासाठी खत व्यवस्थापन, गळ फांदीची ओळख, व ह्युमनी अळीचे प्रभावी नियंत्रण या विषयांवर शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. तर सहाय्यक कृषी अधिकारी श्री रवी चव्हाण यांनी कापसावरील विविध रोग व किडींचे व्यवस्थापन यावर उपयुक्त माहिती दिली.



कार्यक्रमादरम्यान उपस्थित शेतकऱ्यांनी भगवान घुगे, भानुदास घुगे, शामसुंदर मस्के, रवि घुगे, संपतराव कपूरे, कृष्णा घुगे आदी शेतकऱ्यांनी आपले अनुभव मांडून समाधान व्यक्त केले. त्यांनी कृषी विभागाच्या या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले. शेती शाळेनंतर सहभागी शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत प्रशिक्षण किटचे वितरण करण्यात आले तसेच नाष्ट्याचीही योग्य व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये जागरूकता वाढून उत्पादनक्षमता सुधारण्यास निश्चितच मदत होणार आहे, असे मत तालुका कृषी अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

### दोन दिवसापासून परभणीत पावसाची विश्रांती

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहरात पावसाने गेल्या दोन ते तीन दिवसापासून उघडदीप दिली आहे. त्यामुळे शेतकरी तसेच सामान्य नागरिक यामुळे परेशान झालेला दिसत आहेत. सध्या पावसाची मोठी आवश्यक ता आहे. त्यातच यावर्षी पावसाने उशिरा आपली हजेरी लावली होती. तसेच मे महिना पूर्ण पावसाने आपले आगमन केले होते. त्यानंतर मात्र पावसाने चांगलीच उघडदीप दिली यामुळे सर्व वातावरणात कमालीचा उकाडा निर्माण झाला होता. त्याचा परिणाम यावर्षी पावसावर झाला आहे.

## वाघाळा येथील चित्रकाराची पेटींग थेट मुख्यमंत्री दालनात

### पालकमंत्री मेघना साकोरे यांचा पुढाकार

**पाथरी,/प्रतिनिधी-** नुकतीच छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातील १२ गडकोटांची जागतिक वारसास्थळ म्हणून युनेस्कोच्या यादीत नोंद करण्यात आली. या ऐतिहासिक घटनेच्या पार्श्वभूमीवर पाथरी तालुक्यातील वाघाळा येथील चित्रकार सुशील घुंबरे यांनी साकारलेली रायगड किल्ल्याची भव्य प्रतिकृती असलेली कॅनव्हास पेंटिंग मंत्रालयातील मुख्यमंत्र्यांच्या दालनात स्थान मिळवण्यात यशस्वी ठरली आहे.

९ जुलै रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर, परभणीच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या पुढाकाराने हे पेंटिंग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेट म्हणून



प्रदान करण्यात आले. या वेळी मंत्री गिरीश महाजन, मंत्री अतुल सावे, आ. मोनिकाताई राजळे, आ. सिमाताई हिरे, आ. सुरेश धस, खासदार रणजित नाईक निंबाळकर आदी मान्यवर उपस्थित होते. 'जपतो आम्ही शिवछत्रपतींचा वारसा' असे शीर्षक असलेल्या या कलाकृतीने मुख्यमंत्र्यांचे विशेष लक्ष वेधले. पेंटिंगचे कलाकार सुशील घुंबरे हे चित्रकलेचे पदवीधर असून त्यांनी अत्यंत अल्प वेळेत ही कलाकृती साकारली. पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनीच सुशील घुंबरे यांना प्रेरित करून छत्रपती शिवराय व रायगडाच्या प्रतिकृतीचे पेंटिंग तयार करण्यास सांगितले होते. हे पेंटिंग पाहून मुख्यमंत्री फडणवीस यांनी घुंबरे यांच्या कलेचे मनापासून कौतुक केले व ते आता थेट मुख्यमंत्र्यांच्या दालनातील भिंतीवर शोभून दिसणार आहे. या प्रसंगी भाजप युवा मोर्चाचे हनुमान घुंबरे, चित्रकार सुशील घुंबरे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी या कलाकृतीसह स्मृतिचित्रेही टिपली.

### शेतातील सौर उर्जेच्या पाटया गेल्या चोरीला

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनखेड शिवारातील शेतामध्ये बोर वर बसवलेल्या सौर ऊर्जे च्या दोन पाट्या चोरीला गेल्याच्या शेतकऱ्याच्या तक्रारीवरून सोनपेठ पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



राज्य व केंद्र शासनाच्या वतीने मागेल त्या गरजू शेतकऱ्यांना अनुदानावर सौर ऊर्जेचे विज कनेक्शन देण्यात येत आहे. शेती सिंचनासाठी ज्या शेतकऱ्यांनी विहीर अथवा बोअरवेल घेतल्यानंतर आता विजेचे कनेक्शन देण्या ऐवजी सौरऊर्जा मोटार पंप संच चे कनेक्शन देण्यात येत आहे. यासाठी अर्ज केलेल्या सोनपेठ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतावर ५ ते १० टक्के शेतकऱ्यांचा हिस्सा भरुन सौरऊर्जा मोटार पंप बसवून दिले आहेत. यावेळी सोनखेड येथील शेतकरी रामभाऊ घुगे यांच्या गट नं.१३५ मधील बोर वर शासन योजनेतून सौर ऊर्जेच्या नऊ पाट्या व मोटार पंप संच बसवला होता.शनिवार दि.२६ जुलै रोजी दिवसभर शेती कामं करुन रात्री रामभाऊ घरी आले.त्यानंतर दुसऱ्या दिवशी रविवारी दुपारी शेतावर गेले असता त्यांना आपल्या बोर वरील सौर उर्जा च्या दोन पाट्या चोरीला गेल्याचे दिसून आले. सदर प्रकरणी त्यांनी सोनपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून अज्ञात व्यक्तींच्या विरोध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी सोनपेठ पोलीस तपास करत आहेत.



**सेलू- महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर उपोषण सुटले माजी आमदार हरिभाऊ लहाने यांची मध्यस्ती झाल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले होते. यावेळी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी आदी दिसत आहेत.**

## बदलत्या ग्रामीण जीवनाचा पट म्हणजे वाळसरा- गाडेकर

**सेलू,/प्रतिनिधी:** काळ बदलला तसा ग्रामीण भागातील समाजव्यवस्था बदलली असून स्वार्थी, आत्मकेंद्री, असंवेदनशील कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण झाले ज्याने ग्रामीण भागातील महिलांचे, मजुरांचे शोषण वाढले आहे असे मत लक्ष्मण गाडेकर यांनी व्यक्त केले. स्वामी रामानंद तीर्थ हिंदी मराठी ग्रंथालय सेलू आयोजित एक दिवस एक पुस्तक या उपक्रमात आसाराम लोमटे यांच्या वाळसराह्या कथासंग्रहावर ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त प्राचार्य डॉ विनायकराव कोठेकर होते. आजच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीवर भाष्य करताना ते म्हणाले की, कथा काळाला बांधून ठेवायचं काम करत असते. पूर्वी घरातील ज्येष्ठ मंडळी गोष्टी सांगायचे. त्या ऐकत, त्यातून सकारात्मक, चांगल्या गोष्टी घेत पुढची पिढी घडत होती. मात्र काळ बदलला.गोष्टी सांगणारे उरले नाहीत. गोष्टी आता तळहातावर आल्यात, पण ह्या गोष्टी काळाला बांधून ठेवू शकत नाही. समोर आल्या की क्षणार्धात त्या निघून जातात.पुढच्या आणि मागच्या




गोष्टीचे संदर्भ लागत नाहीत. जुन्या पिढीची आपल्या शेती मातीशी नाळ घट्ट जोडलेली होती.आजच्या पिढीला शेती माती विषयी ममत्व उरले नाही.त्यामुळे गावाकडचे ऐश्वर्य सोडून शहरातल्या खुराड्यात युवा पिढी समाधान मानत आहे. जुनी लोकं संवेदनशील होती मात्र युवा पिढी कमालीची असंवेदनशील आहे. मोबाईल क्रांतीमुळे जग जवळ आलं पण आपापसातील नाती मात्र हरवून गेलीत. माणूस माणसात राहिला नाही. आजच्या राजकीय आणि सामाजिक परीस्थितीचे मापदंड बदलले आहेत. ज्या घडल्याच नाहीत त्या गोष्टी आज पेरता येतात आणि चांगल्या पद्धतीने उगवूनही आणता येतात. त्यामुळे गोष्टी पेरणारांची आज मौज आहे. आजच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना कार्यकर्त्यांनी संवेदनशील असावं मात्र भावना विवश नसावं असा सल्ला कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विनायक कोठेकर यांनी दिला. यावेळी ग्रंथालयातील पुस्तक मांडणी करण्यासाठी सहकार्य केल्या बद्दल दिनेश शिंदे यांचा ग्रंथालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अनंत मोगल यांनी तर सूत्रसंचालन बालासाहेब पंडीत ह्यांनी केले. आभार प्रदर्शन सुनील कौसडीकर ह्यांनी केले. कार्यक्रमास ग्रंथालयाचे अध्यक्ष महेश खारकर, चंद्रशेखर मुळावेकर,डॉ.शरद कुलकर्णी,प्रकाश धामणगावकर,रामराम बोबडे,दादासाहेब गाडेकर यांच्यासह रायपूर येथील श्रोते दादासाहेब गाडेकर, पांडुरंग गाडेकर, काशिनाथ गाडेकर,राजेभाऊ गाडेकर, बाबासाहेब गाडेकर, आप्पासाहेब गाडेकर, गुलाबराव गाडेकर,भारत गाडेकर, पांडुरंग सोळंके इत्यादी .कार्यक्रम यशस्वीतेसाठी विजय ढाकणे,माधव गव्हाणे,डॉ.सुरेश हिवाळे यांनी पुढाकार घेतला.

# व्यावसायिक गोपालनानेच होईल शेतकरी समृद्ध आणि संपन्न

कृषी विशेष

**नुकताच २२ जुलै रोजी : शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन साजरा करण्यात आला, त्यावरील विशेष लेख**

आपल्या देशाला कृषिप्रधान संस्कृती लाभली असून, मानवाने शेती अंगिकारण्याच्या आधीपासून गोपालनाचा पुरस्कार केला आहे. आजही पारंपरिक शेतीपासून आधुनिक शेतीपर्यंत शेती आणि पशुधनाचे नाते अखंडपणे टिकून आहे. गोवंशाच्या माध्यमातून मिळणारे शुद्ध, सकस व सात्विक दूध ज्याला संपूर्ण अन्न मानले जाते, यासह नांगरणी, वखरणी, शेतमाल वाहतूक आणि ग्रामीण प्रवासासाठी बैलांची बंडी वापरणे हे सर्व पशुधनाच्या उपयोगाचे उत्तम उदाहरण आहे. गावातील ग्रामस्थांची सकाळ गोठ्यातील शेण काढणे, दुधाची धारा काढणे, चारापाणी करणे, गोठा स्वच्छ करणे अशा कामांनी सुरू होते. गुराख्याच्या मदतीने सामूहिक चराई, शेतातील दैनंदिन कामे आणि बैलजोडीची साथ या सगळ्यांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून गोपालन कार्यरत आहे. गोठ्यातील शेण-मलमूत्र व चारा अवशेष कुजवून तयार होणारे जैविक खत जमिनीच्या आरोग्य आणि उत्पादकतेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारतात गोवंश, म्हशी, शेळ्या, मेंढ्या यांच्या संख्येने आपली आघाडी आहे. म्हणूनच आपला देश जगातील सर्वाधिक दुग्धोत्पादन करणारा देश म्हणून ओळखला जातो. मात्र, प्रति जनावर उत्पादन क्षमता मात्र अजूनही जागतिक सरासरीच्या निम्म्याहूनही कमी आहे.





भारतात पशुपालन हा बहुतेक सर्व स्तरांतील शेतकऱ्यांचा व्यवसाय आहे. अगदी जमीन नसलेल्या कुटुंबांपासून ते मोठ्या शेतकऱ्यांपर्यंत. पशुधनाचा आहार प्रामुख्याने शेतातील तण, अवशेष, पाला-पाचोळा, गव्हांडा, कडबा यांवर आधारित असतो. हे घटक फारसे खर्चिक नसल्याने पशुपालन हा अल्पभांडवली व सहज करता येणारा व्यवसाय आहे.

या प्रक्रियेतून मिळणारे दूध, शेणखत, गोमूत्र आणि दरवर्षी तयार होणारी नव्या पिढीची जनावरे शेतकरी कुटुंबासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. विविध अभ्यासातून हे सिद्ध झाले आहे की, व्यावसायिक दृष्टिकोनातून योग्य नियोजन करून दुग्धोत्पादन करणाऱ्या एका जनावराकडून प्रतिदिन १० लिटर दूध मिळवणे शक्य असून, त्या उत्पन्नाचे मूल्य कोरडवाहू पिकांपेक्षा जास्त असते.

शेती व्यवसायाला शाश्वत करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने पशुधनाच्या सहभागास प्रोत्साहन दिले असून, विविध योजना राबविल्या जात आहेत. विशेषतः देशी गोवंशाचे महत्त्व ध्यानात घेता, त्याच्या जतनासाठी २२ जुलै शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

या उपक्रमांतर्गत देशी गायींची संख्या वाढवणे, त्यांची उत्पादन क्षमता व प्रजनन क्षमता सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे तसेच ग्राहकांमध्ये जनजागृती करणे हे उद्दिष्ट आहे. विविध चर्चासत्रे, प्रदर्शनं, शिबिरे, स्पर्धा आयोजित करून हा उपक्रम लोकचळवळ म्हणून रुजवण्याचा प्रयत्न आहे.

शाश्वत शेतीसाठी शास्त्रोक्त व व्यावसायिक दृष्टिकोनातून गोपालन हाच पर्याय आहे. कृषी विद्यापीठे, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, दुग्धविकास व इतर संबंधित संस्था आपल्यासाठी सदैव तत्पर आहेत.

● **डॉ. किशोर बिडवे**
जनसंपर्क अधिकारी
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला



### व्यावसायिक दृष्टिकोनातून गोपालनासाठी ११ उपाय

१. **गोवंशाचे ग्रेडिंग-अप** : ज्यांना निश्चित वंश माहिती नाही, अशा गायींचे कृत्रिम रेतन किंवा नैसर्गिकरीत्या जातिवंत वळूपासून गर्भधारण करून नव्या पिढीत गुणवत्तावाढ साधता येते.
२. **सामूहिक चराई टाळा** : अशा पद्धतीमुळे जनावरांच्या पोषणात कमतरता येते व प्रजननावर विपरीत परिणाम होतो. मोकळ्या गोठ्यात जनावरांना ठेवावे.
३. **हवेशीर गोठ्यांची व्यवस्था** : गोठा खुला, स्वच्छ, चारापाणी व मुक्त फिरण्यासाठी योग्य हवा अशा पद्धतीचा असावा.
४. **संतुलित आहार** : शारीरिक वजन आणि उत्पादन क्षमतेच्या आधारावर कोरडा चारा, हिरवा चारा व पशुखाद्य संतुलित प्रमाणात द्यावे.
५. **गायींचे होस्टेल** : गावपातळीवर एकत्रित व्यवस्थापन पद्धतीने दुग्ध व्यवसाय फायदेशीर ठरतो.
६. **वैरण उत्पादन** : गावातील ओलित क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांनी वैरण उत्पादन करून गावातच विक्री केल्यास परस्पर फायदेशीर व्यवहार होतो.
७. **गुणवत्तापूर्ण पशुखाद्याचा वापर** : डी-ऑईल केकऐवजी घरगुती किंवा दर्जेदार पशुखाद्यांचा वापर फायदेशीर ठरतो.
८. **दुग्ध व्यवसायाचा वेळ** : सकाळी ७ आणि संध्याकाळी ७ या वेळात दुग्ध संकलन करून शेतीचे इतर कामही करता येते.
९. **दुग्ध पदार्थ प्रक्रिया** : गावातच गटांमार्फत महिलांनी व युवकांनी दूध प्रक्रिया करून उत्पादन विक्री केल्यास अधिक नफा मिळतो.
१०. **गांडूळखत निर्मिती** : गोठ्यातील मलमूत्र, चारा अवशेष, पाला-पाचोळा वापरून गांडूळखत तयार केल्यास शेतीचे आरोग्य सुधारते व उत्पन्न वाढते.
११. **जातिवंत गोवंश निर्मिती आणि विक्री** : स्वतःसाठी उत्तम गोवंश तयार करणे आणि उर्वरित गायींची विक्री केल्यास उत्पन्न वाढते व इतर गोपालकांनाही मदत होते.

**शेवटचा प्रेरणादायी मंत्र**
**खरे नामनिष्कामही ग्रामसेवा!**
**झटू सर्व भावे करून स्वर्ग गावा!!**
**कळू हे वळो दे, देह कार्य पडो दे!**
**घडो दे प्रभू... एवढेच घडो दे!!**

या राष्ट्रसंतांच्या संकल्पनेतील संपन्न, स्वावलंबी ग्रामनिर्मितीसाठी आपण एकत्रित प्रयत्नांची प्रतिज्ञा करूया!

# शेतीतील वाढता उत्पादन खर्च कसा कमी करता येईल?

कृषी माहिती

सध्या शेती क्षेत्र मोठ्या आर्थिक संकटातून जात आहे. उत्पादन वाढवण्यावर भर दिला जात असताना, उत्पादन खर्च कमी करण्यावर फारसा अभ्यास होत नाही. जास्त उत्पादनाच्या नादात खर्चही अनावश्यक वाढतो आणि नफा कमी होतो. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने सद्सद्विवेक बुद्धी वापरून खर्च करणे गरजेचे आहे.



शेती करताना कोणते पीक आपल्यासाठी फायदेशीर ठरेल, याचा अभ्यास हवा. इतर भागात एखाद्या पिकाचे चांगले उत्पादन होते म्हणून ते आपल्या हवामान, माती यांचा विचार न करता लावणे चुकीचे आहे. पीक निवडताना माती-पाणी परीक्षण, हवामान आणि पाण्याची उपलब्धता याचा योग्य अभ्यास व्हायला हवा. शेती मोठी असली, तरी पाण्याची मर्यादा लक्षात न घेता लागवड केल्यास खर्च फुगतो.

बियाणे आणि रोपे यावरही बचत करता येते. सुधारित वाणांची बियाणे २-३ वर्षे वापरता येतात. गहू, हरभरा, सोयाबीन यासारखी बियाणे घरचीच वापरल्यास खर्च कमी होतो तसेच टोकण लागवड, योग्य अंतरे ठेवणे यामुळे कमी बियाणांत जास्त उत्पादन शक्य आहे.

'जास्त खते = जास्त उत्पादन' हा गैरसमज टाळा. रासायनिक खतांपेक्षा सेंद्रिय खतांचा समतोल वापर अधिक फायदेशीर ठरतो तसेच बाजारात मिळणाऱ्या टॉनिक्सचा अतिरेकी वापर हा खर्च वाढवणारा आणि अनेकदा निरुपयोगी ठरतो. त्याऐवजी ह्युमिक ॲसिड, फुल्विक ॲसिड, जिवाणू खत, जीवामृत, गोमूत्र यासारख्या सेंद्रिय पर्यायांचा अवलंब करावा.

इंधन दर वाढत असल्याने मशागतीतही बचत आवश्यक आहे. ट्रॅक्टर भाड्याने घेतल्यास होणारा खर्च हाही उत्पादन खर्चात धरायला हवा. फक्त 'शेत चांगले दिसावे' म्हणून जास्त मशागत करणे टाळा. ट्रॅक्टरची निवड करताना आपल्या क्षेत्राची गरज लक्षात घ्या. ताकदवान ट्रॅक्टर घेऊन फाजील खर्च नको तसेच अवजारे गट शेती पद्धतीने खरेदी केल्यास बचत होते.

कीटकनाशके वापरताना रोगाचा अभ्यास करूनच फवारणी करावी. चुकीच्या वेळी अनावश्यक फवारणी केल्यास मजुरी, इंधन, औषधांचा खर्च वाढतो. एकच घटक असलेल्या औषधांचे विविध ब्रॅण्ड उपलब्ध असतात, त्यामुळे चांगल्या कंपनीची कमी दरात मिळणारी औषधे निवडावी.

मजुरीवर नियंत्रण ठेवण्यासाठी गावातच दर ठरवावे. तणनाशक वापरून काही ठिकाणी मजुरीचा खर्च कमी करता येतो.

शेती ही उत्पादनासाठी आहे, शोभेसाठी नाही. त्यामुळे पीव्हीसी पाईप, पंप, ड्रीप, तार, शेततळे यासारख्या निविष्ठा फक्त गरज आणि क्षमतेनुसारच खरेदी कराव्या. शेवटी केवळ उत्पादन वाढवणे नव्हे, तर उत्पादन खर्च कमी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. असे केल्यासच शेती टिकाऊ व फायदेशीर होईल.

● **सचिन आत्माराम होळकर**
बी.एस्सी. हॉर्टिकल्चर
गोल्डमेडलिस्ट महाराष्ट्र शासन
शेतीमित्र पुरस्कार प्राप्त
लासलगाव, ता. निफाड,
जि. नाशिक

# राज्यात पावसाला विश्रांती

हवामान अंदाज

**भौगोलिक घडामोडी**


२८ जुलै रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ५.३० वाजता वायव्य मध्यप्रदेश व लगतच्या पूर्व राजस्थानवरील स्पष्ट कमी दाबाचे क्षेत्र कमकुवत होऊन, ते एका सामान्य कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतरित झाले आहे.

**ट्रफ्स आणि मान्सून ट्रफ**

ईशान्य अरबी समुद्रापासून आग्नेय उत्तरप्रदेशपर्यंत एक ट्रफ रेषा पसरलेली आहे. मान्सून ट्रफ रेषा श्री गंगानगरपासून ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत विविध ठिकाणांमधून जाते.

**विदर्भातील साप्ताहिक पावसाचा अंदाज**

- **३०-३१ जुलै** : पाऊस विखुरलेल्या स्वरूपात होण्याची शक्यता.
- **१ ते ७ ऑगस्ट** : अत्यल्प ठिकाणीच स्थानिक वातावरणामुळेच पाऊस होण्याची शक्यता; बहुतांश ठिकाणी भरपूर सूर्यप्रकाश राहील.
- **८ ऑगस्ट** : तामिळनाडू जवळ कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता असून, हे क्षेत्र अरबी समुद्राकडे सरकत चक्रीवादळात रूपांतर होऊ शकते. त्यामुळे राज्यात पुन्हा पावसाळी वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे.



**पश्चिमी विक्षोभ**

जम्मू आणि काश्मीर परिसरात एक नवीन पश्चिमी विक्षोभ सक्रिय झाला आहे, तर याआधीचा विक्षोभ पुढे सरकला आहे.

**ऑफशोअर ट्रफ**

गुजरात ते उत्तर केरळ किनारपट्टीदरम्यान एक ट्रफ रेषा सक्रिय आहे.

**मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र**

- **३०-३१ जुलै** : पाऊस क्वचित ठिकाणी, विखुरलेल्या स्वरूपात.
- **१ ते ७ ऑगस्ट** : पावसाची शक्यता कमी.
- **८ ऑगस्टपासून** : पश्चिम महाराष्ट्रात पुन्हा पावसाला सुरुवात होण्याची शक्यता.

**उत्तर महाराष्ट्र:**

- **३०-३१ जुलै** : काही ठिकाणी हलका पाऊस.
- **१ ते ९ ऑगस्ट** : पावसाला विश्रांती; मात्र पश्चिम किनारपट्टीवरील भाग अपवाद असतील.

**सूचना** : ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पावसाचा जोर कमी असल्याने शेतीची कामे आटोपून घेण्यास ही योग्य वेळ आहे.

● **अभिषेक सु. खेरडे**
हवामान अभ्यासक,
अचलपूर, जि अमरावती

● **संयोजक : निखिल रमेश यादव,**
**कृषी पदव्युत्तर- ८४०८९१२७०६** ●

# कृषी क्षेत्रात सहकार क्षेत्राचा नवा अध्याय सुरु होणार


कृषी योजना




केंद्र सरकारने अलीकडेच जाहीर केलेल्या राष्ट्रीय सहकारी धोरणात महत्त्वपूर्ण सुधारणा करीत कृषी क्षेत्रासाठी सहकार माध्यमातून नव्या संधींचे दार खुले केले आहे. या धोरणाचा उद्देश सहकारी संस्थांना आधुनिक, पारदर्शक व शाश्वत बनविणे आणि शेतकऱ्यांना थेट फायदा पोहोचविणे असा आहे.

**धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये**

- कृषी-आधारित सहकारी संस्था बळकट करणे, प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था, दुग्ध, बियाणे, खत, साखर, मत्स्यव्यवसाय व अन्य कृषी क्षेत्रातील सहकारी संघटनांना आर्थिक आणि तांत्रिक साहाय्य देण्यात येणार आहे.
- डिजिटल सहकार कृषी सहकारी संस्थांना डिजिटलायझेशनसाठी प्रोत्साहन देण्यात येणार असून, शेतकऱ्यांना ऑनलाईन सेवा, बाजारभाव, कर्ज सुविधा आणि प्रशिक्षण मिळणार आहेत.



- एकात्मिक सहकारी साखळी उत्पादनापासून ते प्रक्रिया, पॅकेजिंग, साठवण आणि विक्रीपर्यंतची संपूर्ण शृंखला एकाच सहकारी संस्थेच्या माध्यमातून चालविण्याचा प्रयत्न होणार आहे.
- युवक व महिला सहभाग वाढवणे धोरणात तरुण व महिलांना सहकार चळवळीत सामावून घेण्यासाठी खास प्रावधान करण्यात आले आहे.
- कृषी सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांचे मते, हे धोरण शेतकऱ्यांच्या आर्थिक सबलीकरणासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. स्थानिक पातळीवर योग्य अंमलबजावणी झाली, तर हे धोरण ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलू शकते.
- नवीन धोरणाच्या पृष्ठभूमीवर सरकारने स्थापन केलेले 'राष्ट्रीय सहकार समिती' देखील विविध राज्यांतील सहकारी संस्थांच्या सशक्तीकरणासाठी काम करीत आहे.

**शेतकऱ्यांचा थेट लाभ**

शेतकरी आता त्यांच्या गावातच आधुनिक प्रक्रिया युनिट, थेट बाजारपेठेशी जोडणी आणि आर्थिक साक्षरतेसाठी प्रशिक्षणाची सुविधा मिळवू शकतात.

त्यामुळे शेतमालाला योग्य दर मिळण्यास मदत होईल.

**निष्कर्ष**

राष्ट्रीय सहकारी धोरण २०२५ हे केवळ धोरणात्मक दस्तावेज नसून, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचा रोडमॅप आहे. सहकार ही केवळ चळवळ नसून, ग्रामीण समृद्धीचे बळकटीकरण करणारे शक्तिशाली माध्यम आहे.

● **निखिल र. यादव**
संचालक कृषिशास्त्र

# स्वामीनाथन् आयोग : भारतीय शेतीसाठी एक क्रांतिकारी दृष्टिकोन

२००२ मध्ये भारतातील कृषी क्षेत्र अनेक आव्हानांना तोंड देत होते. कमी उत्पादकता, कर्जात बुडालेले शेतकरी आणि ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर या काही प्रमुख समस्या होत्या. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी तत्कालीन सरकारने प्रसिद्ध कृषी शास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांच्या अध्यक्षतेत राष्ट्रीय कृषी आयोगाची स्थापना केली. या आयोगाला, ज्याला स्वामीनाथन् आयोग म्हणून ओळखले जाते, भारतीय शेतीचे भविष्य घडवण्यासाठी व्यापक शिफारसी करण्याचे काम सोपवण्यात आले होते.



**प्रमुख शिफारसी**

आयोगाने २००६ मध्ये आपला अहवाल सादर केला, ज्यात अनेक महत्त्वपूर्ण शिफारसींचा समावेश होता. त्यापैकी काही प्रमुख शिफारसी खालीलप्रमाणे -

**१) शेतकऱ्यांसाठी हमी भाव**

हमी भाव ही भारतीय सरकारकडून निश्चित केलेली किमान किंमत आहे, ज्यावर शेतकऱ्यांकडून पीक खरेदी केले जाईल. स्वामीनाथन् आयोगाने किमान हमी भावात महत्त्वपूर्ण बदल सुचवले, ज्याचा शेतकऱ्यांवर आणि भारतातील कृषी क्षेत्रावर मोठा प्रभाव पडला.

**आयोगाच्या प्रमुख शिफारसी खालीलप्रमाणे :**

- **हमी भावात वाढ** : अहवालात शिफारस करण्यात आली की, हमी भावात उत्पादन खर्चात ५० टक्के वाढ समाविष्ट असावी. याचा अर्थ असा की, शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाच्या उत्पादनासाठी किमान किंमत मिळेल, ज्यात त्यांना लागवड, खत, पाणी आणि इतर कामांसाठी केलेला खर्च समाविष्ट असेल आणि त्यावर ५० टक्के नफा मिळेल.
- **सर्व पिकांसाठी हमी भाव** : आयोगाने शिफारस केली की, हमी भाव फक्त धान्य आणि कडधान्ये यासारख्या काही निवडक पिकांसाठीच नाही, तर सर्व पिकांसाठी लागू केले जावा.
- **हमीभावाचे वेळेनुसार पुनरावलोकन** : अहवालात असे सुचविण्यात आले की, हमीभावात दरवर्षी किंमतवाढ आणि उत्पादन खर्चात बदल लक्षात घेण्यासाठी वेळेनुसार पुनरावलोकन केले जावे.

**हमीभावातील वाढीचा प्रभाव**

हमीभावातील वाढीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांसाठी चांगल्या किमती मिळाल्या आहेत, ज्यामुळे त्यांचे उत्पन्न आणि जीवनमान सुधारण्यास मदत झाली आहे. यामुळे शेती अधिक आकर्षक बनली आणि तरुणांना या क्षेत्रात राहायला प्रोत्साहन मिळाले. तथापि, काही तज्ज्ञांचा असा युक्तिवाद आहे की, हमीभावामधील वाढीमुळे उत्पादनात वाढ झाली नाही आणि त्यामुळे सरकारवर आर्थिक ताण आला आहे.

### आव्हाने आणि पुढील मार्ग

हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे, हे एक मोठे आव्हान आहे. यासाठी मजबूत खरेदी यंत्रणा, पुरेशी भंडारण सुविधा आणि पारदर्शक बाजारपेठेची आवश्यकता आहे. विविध पिकांसाठी योग्य हमीभाव निश्चित करणे हे आणखी एक आव्हान आहे. हे उत्पादन खर्च, बाजारपेठेतील मागणी आणि पुरवठा आणि इतर घटकांवर अवलंबून असते. दीर्घकालीन टिकाव साधण्यासाठी, हमीभावा व्यतिरिक्त शेतकऱ्यांना समर्थन देण्यासाठी सरकारने इतर धोरणेही राबवणे आवश्यक आहे, जसे की, सुधारित सिंचन सुविधा, कर्जावर अनुदान आणि विमा संरक्षण.

**निष्कर्ष**

स्वामीनाथन् आयोगाने शेतकऱ्यांसाठी हमीभावात महत्त्वपूर्ण बदल सुचवले, ज्यामुळे भारतातील कृषी क्षेत्रावर लक्षणीय परिणाम झाला आहे. हमीभावामुळे शेतकऱ्यांना चांगल्या किमती मिळाल्या आहेत आणि त्यांचे उत्पन्न वाढले आहे. तथापि, हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी आणि दीर्घकालीन टिकाव साधण्यासाठी अनेक आव्हाने आहेत. सरकारने शेतकऱ्यांना समर्थन देण्यासाठी आणि भारतातील शेती अधिक उत्पादक, शाश्वत आणि फायदेशीर बनवण्यासाठी बहुआयामी धोरणात्मक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे.

● **अक्षय अरुण शेळके**
एम.एस.सी. कृषी,

# बीड जिल्ह्यात ७३.६६% शेतकऱ्यांनी घेतला फार्मर आयडी

## प्रशासनाचे शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढून घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जुलै**

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या फार्मर आयडी नोंदणी मोहिमेला बीड जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे . जिल्ह्यातील एकूण ६,२१,५१६ पात्र शेतकऱ्यांपैकी ४,६१,८८९ शेतकऱ्यांनी आपली फार्मर आयडी नोंदणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे . हे प्रमाण ७३.६६ टक्के इतके असून , उर्वरित शेतकऱ्यांनी तातडीने आपली नोंदणी करून घ्यावी , असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन केले आहे . २४ जुलै रोजी सर्व महसूल अधिकाऱ्यांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली होती यावेळी अपर जिल्हाधिकारी सर्व उपजिल्हाधिकारी तहसीलदार उपस्थित होते . या बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी यांनी उर्वरित शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तात्काळ काढून घेण्याबाबत आवाहन केले होते .

यासंदर्भात बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी




अश्विनी जिरंगे – सोनवणे आणि निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी संयुक्तपणे जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना लवकरात लवकर फार्मर आयडी काढण्याचे आवाहन केले आहे .

या विषयाच्या संदर्भाने आणि इतर विषयांबद्दल बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी , सर्व ग्राम महसूल अधिकारी , सर्व कृषी सहाय्यक यांची संयुक्त बैठक सामाजिक न्याय भवन येथे घेतली . यावेळी नुकताच पदभार घेतलेले गटविकास अधिकारी अशोक राठोड , तालुका कृषी अधिकारी अशोक साळी व इतर अधिकारी उपस्थित होते . यावेळी बोलताना तहसीलदार शेळके यांनी नमूद केले की फार्मर आयडी ही शेतकऱ्यांची अधिकृत ओळख आहे . याशिवाय कोणत्याही शासकीय शेतीसंबंधित योजनेचा लाभ घेता येणार नाही . यामध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान योजना , नमो सन्मान निधी , पीक विमा , पीक कर्ज , नैसर्गिक आपत्ती भरपाई , धान खरेदी , तसेच पंचायत समिती आणि महसूल विभागाच्या विविध योजनांचा समावेश आहे .

फार्मर आयडीसाठी शेतकऱ्यांना आपल्या नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रावर ( सी एस सी ) जावे लागेल . यासाठी आधार कार्ड, ७/१२ किंवा ८अ उतारा आणि आधार लिंक असलेला मोबाईल नंबर आवश्यक आहेत .जिल्ह्यातील धारूर तालुक्यात सर्वाधिक म्हणजे ८४.२१ टक्के शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून , वडवणी तालुक्यात हे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ६२.७२ टक्के आहे . बीड , आष्टी , केज , गेवराई , पाटोदा आदी तालुक्यांमध्येही नोंदणीचे प्रमाण ७५ टक्क्यांहून अधिक आहे.प्रशासनाने स्पष्ट केले आहे की , शेतकऱ्यांनी जर फार्मर आयडी काढले नाही तर भविष्यात कोणतीही सरकारी मदत किंवा योजना त्यांना मिळणार नाही . त्यामुळे ही नोंदणी हक्काची आणि गरजेची असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे .





# १५९ कोटींच्या नगररोडचे निकृष्ट काम अवघ्या ४ महिन्यांत पडले खड्डे!

## गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह;डागडुजी करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न चौकशी करून कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जुलै**

बीड शहरातील मुख्य शासकीय कार्यालयांना जोडणाऱ्या नगररोडच्या २४.५ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम जून २०२४ मध्ये सुरू झाले. तब्बल १५९ कोटी रुपये खर्च करून हे काम अंतिम टप्प्यात आलेले असतानाच, अजून पूर्णही न झालेले रस्ते फक्त चार महिन्यांतच खचू लागले असून अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत.

विशेषतः जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच रस्त्यावर खड्डे पडल्याने नागरिकांत संतापाची लाट पसरली आहे. प्रशासनाने तातडीने डागडुजी करून विषय थोपवण्याचा प्रयत्न केला असला, तरी कामाच्या निकृष्ट दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी जिल्हाधिकारी बीड आणि महाराष्ट्र राज्य महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी तक्रार दाखल केली असून, दोषींवर कठोर कारवाईसह सखोल चौकशीची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.हे रस्ते काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अंतर्गत साकेत कन्स्ट्रक्शन या कंपनीला दिले असून, डिसेंबर २०२४ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती.

# वृक्षारोपण व संवर्धन काळाची गरज: पत्रकार अनिल महाजन




**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.३० जुलै**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या राजमाता जिजाऊ महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) ५१ महाराष्ट्र बटालियनच्या सूचनेनुसार 'ग्रीनिंग इंडियाज वेस्टलँड' या कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले पत्रकार श्री. अनिल महाजन यांनी एनसीसी कॅडेट्सशी संवाद साधताना सांगितले की, एनसीसीच्या माध्यमातून वृक्ष लागवड करून नापीक जमिनीला सुजलाम व सुफलाम बनवता येते. यातूनच पर्यावरणाचे संवर्धन होते. आजच्या युगात पर्यावरणाचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी एनसीसी कॅडेट्सना मार्गदर्शन करताना सांगितले की, एनसीसी कॅडेट्स शिस्तीचे असतात. वृक्ष लावणे सोपे आहे, मात्र त्याचे संवर्धन करणे अवघड असते. प्रत्येकाने वृक्षांचे संवर्धन करून 'ग्रीनिंग इंडियाज वेस्टलँड' या उपक्रमात सहभागी होऊन भारताची नापीक जमीन हरितमय करावी. असे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमांतर्गत प्रत्येक कॅडेट्सने पाच वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले. कार्यक्रमासाठी छात्र सेना अधिकारी श्री. हनुमंत मंत्रे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी आणि एनसीसी कॅडेट्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले, तर आभार श्री. हनुमंत मंत्रे यांनी मानले.

# मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सवी मेळावा: माजी विद्यार्थ्यांचा स्नेहबंध २ ऑगस्ट रोजी

## २५ वर्षांच्या समाजसेवेचा गौरव; मान्यवरांच्या उपस्थितीत कृतज्ञता सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३० जुलै**

मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाईच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाच्या वतीने येत्या शनिवार, दि. ०२ ऑगस्ट २०२५ रोजी 'कृतज्ञता सोहळा व स्नेहसंमेलन मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. महाविद्यालयाच्या कल्याण मंडपम येथे सकाळी १०.३० वाजता हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम संपन्न होणार असून, माजी विद्यार्थी, प्राध्यापक, विद्यमान विद्यार्थी आणि परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्था, अंबाजोगाईचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर बर्दापुरकर हे असतील. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी श्री. मा. दीपक वजाळे हे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख मार्गदर्शक म्हणून

मानवलोक संस्थेचे कार्यवाह श्री. अनिकेत लोहिया यांची प्रमुख उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे. तसेच, मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. रमा पांडे या 'सन्मानमूर्ती' म्हणून उपस्थित राहतील.

या मेळाव्याचा मुख्य उद्देश, मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाने गेल्या पंचवीस वर्षांत समाजसेवेसाठी आणि सामाजिक विकासासाठी दिलेल्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा आहे. महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले हजारो विद्यार्थी आज विविध क्षेत्रांमध्ये आपले योगदान देत आहेत. या सोहळ्याच्या माध्यमातून हे सर्व माजी विद्यार्थी एकत्र येतील, त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळेल आणि नवीन पिढीतील विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवांचा लाभ घेता येईल.

हा स्नेहसंमेलन मेळावा केवळ गतकाळाचे स्मरण नसून, भविष्यासाठी नवीन ऊर्जा आणि दिशा देणारा ठरणार आहे. माजी विद्यार्थी संघाच्या या उपक्रमामुळे महाविद्यालयाची गौरवशाली परंपरा अधिक दृढ होईल, तसेच सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य अखंडपणे सुरू ठेवण्यास प्रोत्साहन मिळेल. महाविद्यालयाच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून, या सोहळ्यातून ते अधिक सक्रिय होतील अशी आशा आहे.

डॉ. हनुमंत साळुंके अध्यक्ष तसेच सर्व सभासद माजी विद्यार्थी संघ, मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई यांनी या महत्त्वपूर्ण कार्यक्रमास सर्व माजी विद्यार्थी, हितचिंतक आणि नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# स्व.महादेव मुंडे कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी बीडमध्ये १ आगस्ट रोजी सर्व धर्मीय सर्वपक्षीय बैठक


**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जुलै**

परळी शहरातील व्यापारी महादेव मुंडे यांची अतिशय क्रूरतेने हत्या झाल्यानंतर पोलिसांना अजूनही महादेव मुंडे यांचे मारेकरी सापडत नाहीत. न्याय मिळावा यासाठी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरीताई मुंडे यांचा गेल्या अनेक दिवसापासून लढा सुरू आहे. मात्र मुंडे कुटुंबीयांना अजून न्याय मिळालाच नाही. आता मनोज दादा जरांगे पाटील आणि मराठा समाज हेच आपल्याला न्याय मिळवून देऊ शकतात या विश्वासाने ज्ञानेश्वरीताई मुंडे यांनी मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांना हाक दिल्यानंतर मनोज दादा जरांगे पाटील आणि सकल मराठा समाज ज्ञानेश्वरीताई मुंडे यांच्या पाठीशी उभा राहिला आहे.




स्व.महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी बीड जिल्ह्यातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात मोठे आंदोलन उभे राहणार आहे. स्व.महादेव मुंडे यांना न्याय - मिळवून देण्यासाठी दि.१ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता बीड शहरातील कॅनॉल रोड येथील रामकृष्ण लॉन्स येथे बीड जिल्हा सकळ मराठा समाजाच्या वतीने सर्व धर्मीय व सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीला मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे उपस्थित राहणार आहेत. तसेच यावेळी स्व.महादेव मुंडे यांचे कुटुंब सुद्धा उपस्थित असणार आहे. या बैठकीमध्ये आंदोलनाची पुढील दिशा ठरणारा असून महत्त्वपूर्ण विषयावर चर्चा होणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आजी माजी खासदार, आमदार, मंत्री, राज्यमंत्री, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, सरपंच यांच्यासह विविध पक्षातील पदाधिकारी नागरिक यांनी मोठ्या संख्येने या आयोजित बैठकीला उपस्थित रहावे असे आवाहन सकल मराठा समाज बीड जिल्हा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# सदोष रेल्वेपुल प्रकरणात कारवाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जुलै**

बहुचर्चित, बहुप्रतिक्षित आणि जिल्ह्याच्या विकासात मैलाचा दगड ठरणारा अहिल्यानगर –बीड– परळी लोहमार्ग पुर्णत्वाकडे जात असुन रेल्वे रूळ अंथरणे, रेल्वे स्टेशन उभारणीचे कामही मार्गी लागले असले तरी या मार्गावर इलेक्ट्रिक जोडणीचे काम रखडलेले असल्याने जलदगती चाचणी होऊनही बीडला रेल्वे कधी धावणार? असा प्रश्न बीडकरांना पडला आहे. रखडलेले काम तातडीने पूर्ण करावे या मागणीसह च–हाटा रोडवरील पालवण फाटा येथील पावणे ३ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल पाडण्याचे काम सुरू आहे हा जनतेच्या पैशांचा अपव्यय असुन संबंधित अभियंता आणि कंत्राटदार यांच्याकडून नुकसानभरपाई वसूल करण्यात यावी व तसेच बहुतांश रेल्वे पुलाखाली पावसाळ्यात पाणी साचत असल्याने ग्रामस्थांना वाहतुकीची अडचण येते त्यामुळे पाण्याचा निचरा करण्याची उपाययोजना करावी या प्रमुख मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२८ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करून जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे , पांडुरंग हराळे,अशोक येडे जिल्हाध्यक्ष (आप), रामधन जमाले जिल्हाध्यक्ष( इंटक), जरांगे पाटील, किष्किंधा पांचाळ , शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील आदी सहभागी होते.

बीड रेल्वेसाठी गेल्या ४० वर्षांपासून स्वातंत्र्य सैनिक ,रेल्वे मागणी आंदोलन समिती, रेल्वे कृती संघर्ष समिती, अनेक नागरीक युवा कार्यकर्ते यांनी रस्त्यावर उतरून संघर्ष केला आहे. वेळप्रसंगी आंदोलकांना जेलमध्येही जावे लागले आहे.अहिल्यानगर – बीड – परळी या २६१ किलोमीटर रेल्वे मार्गावरील ८० टक्के रेल्वे रूळ अंथरण्याचे आणि रेल्वे स्टेशन उभारणीचे काम कामही मार्गी लागले आहे. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड स्थानकापर्यंत रेल्वेची जलदगती चाचणी घेण्यात आली.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिन ४ ऑगस्टला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जुलै**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, ४ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदप त्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधि कारी कार्यालयाने कळवले आहे.

# कौशल्य ,रोजगार, उधोजकता व नाविन्यता विभाग, मुंबई शासकीय तंत्र प्रशाला येथे द्विलक्षी अभ्यासक्रम प्रवेशास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जुलै**

येथील शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, बीड (शासकीय आयटीआय परिसर) येथे इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता द्विलक्षी अभ्यासक्रमातील ऐच्छिक विषय घेण्यासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. या अंतर्गत इलेक्ट्रिकल मेंटेनन्स, स्कूटर मोटर सायकल सर्व्हिसिंग व मेकानिकल मेंटेनन्स या विषयांपैकी एक विषय ऐच्छिक निवडता येतो. सदरील विषय हा एकुण २०० गुणांचा असून त्यापैकी प्रात्यक्षिक परीक्षेचे १२० गुण व थेअरी परीक्षेचे ८० गुण असतात. हे विषय इंजिनिअरींग क्षेत्रामध्ये करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त असून, यामुळे इयत्ता १२ वी परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळविणे शक्य आहे तसेच या इंजिनिअरींग ग्रुपच्या विषयामुळे त्यांना इंजिनिअरींगचे मुलभूत ज्ञान प्राप्त होते व त्याचे महत्व लक्षात येऊन आवड निर्माण होते.

हे विषय घेण्यासाठी बीड तालुक्यातील कोणत्याही महाविद्यालयात इयत्ता ११ वी तील प्रवेशित विद्यार्थी विहित नमुन्यात अर्ज करु शकतात. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, बीड (शासकीय आयटीआय परिसर) येथे संपर्क साधावा. तसेच सविस्तर माहितीसाठी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.जी.पी.गवळी – ९४२१६१०९०१,एस.महिंद्रकर – ८६६८५७०८९९, डी.टी. गायकवाड – ९८८१४५१७ ५०यांच्याशी असे आवाहन शासकीय तंत्र प्रशाला केंद्र तथा कनिष्ठ महाविद्यालय, मुख्याध्या पक/प्राचार्य यांनी केले आहे.

# ‘परिक्रमा यात्रा उत्सव-२०२५’साठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.३० जुलै -**



श्री दत्त शिखर संस्थान श्री क्षेत्र माहूरगड येथे ०३ ते १० ऑगस्ट या कालावधीत नारळी पौर्णिमा म्हणजेच रक्षाबंधन यात्रोत्सव ०३ ते १० ऑगस्ट या कालावधीत साजरा केला जाणार असून, या यात्रेचे विशेष धार्मिक आकर्षण असलेला पंचक्रोशी परिक्रमा वेढा ८ ऑगस्ट रोजी निघणार आहे. त्यानिमित्ताने दि.२८ जुलै रोजी जिल्हाधिकारी, नांदेड राहुल कर्डीले तसेच अविनाश कांबळे उपविभागीय अधिकारी, किनवट यांचे मार्गदर्शनाखाली मुगाजी काकडे तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी माहुर यांचे अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात सर्व संबधित विभाग प्रमुखांची यात्रा नियोजन बैठक घेण्यात आली.

यावेळी सभेचे अध्यक्ष तहसीलदार काकडे यांनी परिक्रमा यात्रेतील प्रशासकीय नियोजन व्यवस्थेबाबत विभाग प्रमुखांकडून यात्रा व्यवस्था व नियोजन बाबतीत आढावा घेत मार्गदर्शन केले.तर उपस्थित संबंधित विभाग प्रमुख वा त्यांचे प्रतिनिधींनी परिक्रमा यात्रेसाठी लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना सर्व प्रकारच्या सोईसुविधा पुरविण्यासाठी आपापल्या विभागाच्यावतीने करण्यात येत असलेल्या व्यवस्थेच्या तयारी बद्दल सभागृहास माहिती दिली.

यावेळी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाकडून यात्रे दरम्यान माहूरगड, अनुसया माता मंदिर व रेणुका माता मंदिर येथे आरोग्य पथक नेमण्यात आले असून,मातृतीर्थ येथे आरोग्य कॅम्प ठेवण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली.यात्रे दरम्यान दि.०८ व ०९ ऑगस्ट रोजी खाजगी वाहने गडावर जाणार नाहीत. पार्किंग व्यवस्था माहूर गावात करण्यात आलेली आहे. भक्तांच्या सोयीसाठी एसटी महामंडळाने ६० बसेसची व्यवस्था केलेली आहे.अशी माहिती माहूर आगाराकडून देण्यात आली.नगर पंचायतला पार्कींग, लाईटिंग,फिरते स्वच्छतागृह, व्यवस्था करणे बाबत जबाबदारी देण्यात आली. तसेच विद्युत वितरण कंपनीला २४ तास लाईन ठेवणे बाबत निर्देशित करण्यात आले.

वनविभागामार्फत २८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.तर ,पोलीस विभागामार्फत पुरेसा बंदोबस्त व चेकपोस्ट ठेवण्यात आला असल्याचे सांगण्यात आले.

तसेच दत्तशिखर संस्थान मार्फत शिखर गडावर व अनुसया माता मंदिर येथे सुरक्षा, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, तसेच अन्नछत्राची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती संस्थानकडून देण्यात आली.

सर्व संबंधित विभाग प्रमुखांशी परिक्रमा वेढा यात्रोत्सव व्यवस्था नियोजनाच्या इत्यंभूत माहितीचा आढावा घेऊन करण्यात आलेल्या साधक चर्चे नंतर सर्वांना आपापली जबाबदारी नेमून देण्यात आली.यावेळी मार्गदर्शन करताना तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी मुगाजी काकडे यांनी, सर्व संबंधित प्रशासकीय विभाग प्रमुखांनी त्यांना नेमून दिलेली जबाबदारी कोणत्याही प्रकारची कामात कुचराई न करता प्रामाणिकपणे पार पाडून परिक्रमा यात्रा शांततेत आणि निर्विघ्नपणे यशस्वीरीत्या पार पाडण्याठी सहकार्य करावे , असे आवाहन केले.

सदर बैठकीस आन्येबोईनवाड सहा. पो.नि.,आर.बी शेंडे उपकार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.,डॉ. आर. डी.माचेवार तालुका आरोग्य अधिकारी, जी.एन. नाईक, व्यवस्थापक श्रीदत्तशिखर संस्थान, डि.के. भिसे. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम, उपविभाग,वाय. एम.साबळे, व्यवस्थापक श्रीरेणुकादेवी संस्थान,चंद्रकांत भोपी, विश्वस्त श्री रेणुकादेवी संस्थान,डॉ. के.बी. वाघमारे, अधिक्षक, ग्रा.रु.,एस. एस. गजलवाड, कार्यालयीन अधिक्षक, न.पं.,आर.एन. लोखंडे विस्तार अधिकारी, पं.स.,सी.आर. समर्थवाड. म.रा. मार्ग परिवहन महामंडळ, वन परिक्षेत्र अधिकारी,कैलास जेठे,नायब तहसिलदार,सिध्दार्थ कुलदिपके, सहा. महसुल अधिकारी, तहसिल कार्यालय,एस. के. साळसुंदर मंडळ अधिकारी,चंद्रकांत बाबर ग्राम महसुल अधिकारी,एस.एल. सातपुते. महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय,आदी माहूर येथील विविध विभागाचे अधिकारी/ कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# अखेर सरेगावात पोहोचली बस !

## शालेय विद्यार्थिनींनी केले चालक व वाहकांचे स्वागत



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.३० जुलै -**

तालुक्यातील सरेगाव येथील शालेय विद्यार्थिनींची अनेक वर्षापासून होणारी ससेहोलपट थांबली असून परिवहन मंडळाची बस गावात येताच शालेय मुलींच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे. त्यामूळे गेल्या दीड महिन्यापासून संदीपकुमार देशमुख यांच्या पाठपुराव्यास यश आले आहे. यावेळी ग्रामस्थ व शालेय विद्यार्थिनींनी चालक व वाहक यांचे स्वागत केले. बस आली शाळेत चला असे म्हणत पाठीवर दप्तर घेऊन सरेगावातील मुलींनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला.

सरेगावातील मुलींना शिक्षणासाठी बारड येथे जावे लागते. परंतु बस गावात येत नसल्याने गावच्या शिवेपर्यंत दोन किलोमीटर जाणे आणि दोन किलोमीटर येणे असा संघर्षमय प्रवास मुलींच्या शिक्षणावर विपरीत परिणाम करणारा ठरत होता. शासन एकीकडे बेटी पढावो बेटी बचाओ या अभियानाचा गाजावाजा करत असताना मुलींच्या शाळेत शिक्षणासाठी बस नसल्याने सरेगाव मात्र यास अपवाद ठरले होते. बस नसल्याने पायपीट करण्यासाठी सकाळी सात वाजता घराबाहेर पडावे लागत असे. आणि पुन्हा सायंकाळी दोन किलोमीटरची तीच ससेहोलपट ठरलेली होती.

याबाबत नांदेड परिवहन विभागीय मंडळाचे प्रमुख चंद्रकांत वडजकर , विभागीय वाहतूक अधिकारी कमलेश भारती यांच्याकडे प्रा. संदिपकुमार देशमुख बारडकर लेखी निवेदन देऊन शालेय विद्यार्थिनींच्या प्रवासासाठी गेल्या दीड महिन्यापासून सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यानुसार सरेगाव रस्त्याचा पाहणी अहवालही परिवहन मंडळाने तयार केला. परिवहन महामंडळाचे वाहतूक अधिकारी कमलेश भारती, आगारप्रमुख मिलिंद सोनाळे यांनी सरेगावात विद्यार्थिनींसाठी दि.३० जुलै रोजी 'निळी परी' येणार असल्याचे संदिपकुमार देशमुख यांना सांगितले.

गावात दि.३० जुलै रोजी सकाळी साडे नऊच्या सुमारास बस दाखल झाली. यावेळी शालेय मुलींनी गाडीच्या वाहक व चालक यांचा पुष्पहार देऊन सन्मान करत पेढे वाटून जल्लोष व्यक्त केला. याप्रसंगी तालुका काँगेस कमिटीचे अध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर यांनी नारळ फोडून गाडीचे पूजन केले. त्यावेळी प्रा. संदीपकुमार देशमुख, सरपंच बालाजी पाटील, बाबुराव कळणे, गोपिराज कळणे पाटील, भास्कर कळणे, चक्रधर पाटील, भगवान पवार, शिवाजी गिरे, प्रशांत कळणे, पुताजी कळणे, लखन गिरे, चक्रधर कळणे, अविनाश कळणे, सटवाजी कळणे, गजानन कळणे , राम कल्याणकर आदि सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### देगलूर उपजिल्हा रुग्णालयात व्यंकटेश्वरा हिरो मोटर्स यांच्यावतीने वृक्षारोपण

**देगलूर** -नागपंचमी या सणाच्या शुभ औचित्यावर उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे शासन निर्देशानुसार जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय पेरके व वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांच्या मार्गदर्शना



खाली १०१ झाडांचे वृक्षारोपण करुन रुग्णालय परिसरात नव संजीवनी या उद्यानाची निर्मिती करण्यात आली. या मध्ये पर्यावरण पूरक व मनमोहक फुलाची झाडे लागवड करण्यात आली आहे. या झाडांच्या जतानासाठी उंच लोखंडी जाळीचे कुंपण चहुबाजूंनी तयार करण्यात आले आहे. वेंकटेश्वरा हिरो शोरुम यांच्या च्या वर्धापनदिनानिमित्ताने प्रमोद चौधरी यांच्या वतीने ५१वृक्ष आणि ५० वृक्ष वैद्यकीय अधीक्षक देवणीकर तसेच डॉक्टर्स व कृष्णा डायग्नोस्टीक सेंटर या सर्वांच्या सौजन्याने उपलब्ध झाली. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर , डॉ. विश्वनाथ मलसेटवार, डॉ. सचिन गायकवाड, डॉ. अनिल थडके, डॉ. रवि काळे, डॉ. पितळे, डॉ. अमोल बामणे , डॉ. संजय लाडके, डॉ. सुनील जाधव , डॉ. संजय इंगळे , डॉ. मोना चौडेकर, डॉ.नजीब , डॉ. गोदावरी सावळे , प्रमोद चौधरी विकास मोरे , सदाशिव शिंदे , कैलास येसगे कावळगावकर , महेश पाटील अंदेगाववाडीकर, पत्रकार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष विशाल पवार यांच्यासह स्वच्छता जागर ग्रुप चे सत्यनारायण नागोरी, सुर्यकांत सुवर्णकार, विजय यन्नावार , भेंडेगावे ,ओ. एस. रावसाहेब मोरे, इन्चार्ज सिस्टर मनीषा बोइनवार , राघवेंद्र हवेलीकर सी टी स्कॅन , संतोष मुंगीलवार , विकी पाईकराव, मोमीन सिस्टर , प्रियंका धानदु , याहिया खान पठाण , राजेश्वर मंटगे, विनायक पाटील, छाया पाटील ,रेणुका धुमाळे ,मनीषा गोंदे, प्रवीण येरेवाड, माधव मगर , जमील मामा, राहुल लोकडे, विजय सह उपजिल्हा रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स, परिचारिका , कृष्णा डायग्नोस्टीक सी टी स्कॅन सेंटर, एक्स रे , सोनोग्राफी , औषध निर्माण विभाग यांचे कर्मचारी , शहरातील पर्यावरण प्रेमी , डॉक्टर्स, हीरो शो रूम कर्मचारी , देगलूर शहर स्वच्छतेचा जागर ग्रुप पदाधिकारी व शहरातील सामाजिक कार्यकर्ते या सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

### २९ वर्षांच्या शिक्षण साधनेला सलाम ; वसंत पवार होटाळकरांचा सेवानिवृत्ती गौरव!


**नायगाव** -शिक्षण ही एक तपश्चर्या आहे, आणि या तपश्चर्येची उज्वल



कहाणी लिहिणारे वसंत दत्तात्रय पवार होटाळकर सर हे श्री. सदगुरु नराशाम विद्यालय, टेंभुर्णी येथून नियत वयोमानानुसार ३१ जुलै रोजी सेवा मुक्त होत आहेत. त्यांच्या तीन दशकांच्या अमूल्य सेवेला मानवंदना देण्यासाठी,विद्यालयाच्या प्रांगणात गुरुवारी सकाळी सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. वसंत पवार सरांनी विज्ञानासारखा क्लिष्ट विषय हा अत्यंत सोप्या आणि प्रभावी पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला.मागील २९ वर्षे ३५ दिवस त्यांनी अखंड व निरंतरपणे ज्ञानदानाची सेवा बजावत असताना, ग्रामिण भागातील अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणले आहेत. श्री साई शिक्षण संस्था, खतगांव संचलित या विद्यालयातील त्यांच्या योगदानाची नोंद ही राज्य पातळी वर झाली आहे.

### साहेबराव गजभारे नेट परीक्षा उत्तीर्ण

**नवीन नांदेड** -युजीसी जुन २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या नेट परिक्षेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ माध्यम संकुलाचे



संशोधक साहेबराव गजभारे यांनी हिंदी विषयात नुकतेच यश संपादन केले आहे. या यशाबद्दल माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक प्रा. डॉ.राजेंद्र गोणारकर, अंतरविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ.चंद्रकांत बाविस्कर, प्रा.डॉ.सुहास पाठक,प्रा.संजय नरवाडे, डॉ.महेश जोशी, प्रा.डॉ.रमेश ढगे,उप कुलसचिव डॉ.रवि सरोदे,काळबा हनवते, प्रा.गिनगिने ,प्रा.डॉ.राजपाल चिखलीकर , डॉ. प्रशांत घोडवाडीकर, हर्षवर्धन दवणे, मनोहर सोनकांबळे,कंधारकर, शेळके,भारती तांबे, आसाराम बापू काटकर, महेंद्र डुलगज,विजय हंबर्डे, इंजि. सम्राट हटकर शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी या यशा बद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

### महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभेच्या महाराष्ट्र कार्याध्यक्षपदी रामदास पाटील सुमठाणकर

**नांदेड**-महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभेच्या महाराष्ट्र कार्याध्यक्षपदी रामदास पाटील सुमठाणकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सभेचे प्रदेशाध्यक्ष रमेश आवटे व प्रदेश सरचिटणीस चंद्रशेखर होनराव यांनी



हि निवड केली आहे. महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभेचे पुर्नजीवन करणे, ग्रामपातळीवर शाखा स्थापन करुन समाज संघटीत करणे, समाजाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक उत्कर्षासाठी शासन दरबारी प्रयत्न करुन समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करण्याचा विश्वास रामदास पाटील सुमठाणकर यांनी व्यक्त केला. या नियुक्तीबद्दल त्यांनी वसंतराव नागरकर, रमेश औटे, चंद्रशेखर होनराव, सुरेंद्र गाढवे आदीसह अनेकांचे आभार मानले तर रामदास पाटील सुमठाणकर यांच्या नियुक्तीबद्दल सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

# पो. नि. चिंचोलकर नियंत्रण कक्षात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३० जुलै -**

ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांची रवानगी पोलीस नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे. मागील चार दिवसापूर्वी गोदावरी नदीत स्वतः पोहत जावून त्यांनी वाळू माफियावर कारवाई केल्याने मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी झोतात आले होते.

जवळपास वर्षभरापूर्वी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांची लोहा येथून ग्रामीण पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली. या वर्षभराच्या कार्यकाळात त्यांनी अनेक वाळू माफियावर कारवाई केली. गुन्हेगारांना हद्दपार केले तसेच मोक्कातील एका आरोपीवर गोळीबार करुन अटक केली होती. त्यांच्या या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त होत असतानाच मंगळवारी त्यांची रवानगी नियंत्रण कक्षात करण्यात आली. पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या आदेशावरुन त्यांना नियंत्रण कक्षात पाठविण्यात आले. दरम्यान पोलीस दलातील अंतर्गत राजकारणातून चिंचोलकर यांना नियंत्रण कक्षात पाठविण्यात आले असावे, अशी चर्चा सुरु आहे.

# आ. भिमराव केराम यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत अनेकांचा भाजपा प्रवेश



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.३० जुलै -**

किनवट विधानसभा क्षेत्राचे आमदार भिमराव केराम यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवून नांदेड जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष दिनकर दहिफळे, बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे, तसेच बाजार समितीच्या संचालकासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने भारतीय जनता पक्षात (भाजपा) प्रवेश केला. यामुळे स्थानिक राजकारणात मोठा भूकंप झाल्याचे चित्र आहे..

प्रवेश करणाऱ्यांमध्ये पुढील मान्यवरांचा समावेश आहे: दिनकर दहिफळे (माजी अध्यक्ष, नांदेड जिल्हा बँक), गजानन मुंडे (सभापती, बाजार समिती), बालाजी बामणे, श्रीराम कांदे, सुनिल घुगे, संतोष दासरवार, प्रल्हाद सातव, प्रेमसिंग साबळे, कैलास बिज्जमवार, संदिप मुंडे, ज्ञानेश्वर दहिफळे, अजित साबळे, शिवराज मुंडे, माधव मुंडे, केशव फड, मारोती गायकवाड, श्रीनिवास मुंडे, डॉ. नागनाथ पिनाटे, संदिप सातव, संदिप लाखाडे, इश्वर थोरात, भगवान इंजारे, बालाजी कांदे, बालाजी शेळके, पागोजी तोरकड, मॉन्टी मुंडे, रॉबिन साबळे, जऊसिंग चौफाडे, करतार बामण, अजित महाराज, सुदाम काळे इत्यादींनी पक्षात प्रवेश केला. प्रवेश सोहळ्यात बोलताना आमदार भिमराव केराम यांनी नवागतांचे मनःपूर्वक स्वागत करत सांगितले की, या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पक्ष हीच खरी पर्याय देणारी संघटना आहे. आज ज्या जेष्ठ आणि नव्या पिढीतील कार्यकर्त्यांनी प्रवेश केला आहे, त्यांचा अनुभव व उत्साह भाजपाला अधिक बळकट करणार आहे. या पक्षप्रवेशामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपा पक्षाच्या ताकदीत मोठी भर पडली आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपा कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

या वेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार, जिल्हा सरचिटणीस संदिप केंद्रे, ओबीसी नेते बाबुराव केंद्रे, भाजपा युवा नेते रवि चव्हाण, मंडल अध्यक्ष स्वागत आयनेनिवार, जिल्हा परिषद सदस्य सुर्यकांत अरंडकर , उमाकांत क-हाळे, भगवान हुरदुके, दत्ता आडे, विवेक केंद्रे, ड. माझ बडगुजर, जयराज वर्मा, सागर पिसारीवार, सुनिल मच्छेवार, संतोष कनाके यांची उपस्थिती होती. नवीन राजकीय समीकरणांवर सर्वांचे लक्ष केंद्रित या पक्षप्रवेशामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता असून, हे प्रवेश केवळ संख्या वाढवणारे नसून, त्या मागे समाजातील विविध घटकांचा भाजपावर दाखवलेला विश्वास अधोरेखित करणारे आहेत.

# शुक्रवारचा आठवडी बाजार बंद

**नांदेड** -नांदेड जिल्ह्यात व शहरात १ ऑगस्ट २०२५ रोजी दरवर्षीप्रमाणे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. यादिवशी शुक्रवार येत असल्याने या दिवशी नांदेड शहरात भरणारा आठवडी बाजार शुक्रवार ऐवजी शनिवारी भरण्यात येणार आहे, कृपया शेतकरी, ग्राहक, व्यापारी यांनी नोंद घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

मार्केट अँड फेअर अँक्ट १८६२ चे कलम ५ अन्वये १ ऑगस्ट रोजी शुक्रवारी भरणारा आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्गमित केले आहेत.

# आ. चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त कवी संमेलन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३० जुलै -**

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार तथा माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त येत्या २ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता शंकराव चव्हाण प्रेक्षागृह नांदेड येथे महाराष्ट्रातील नामांकित कवींचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे अशी माहिती कवी संमेलनाचे आयोजक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष माधव पावडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

आपल्या कार्यकर्तृत्वाने आणि लोकसंपर्कामुळे नांदेड जिल्ह्यातील लोकनेते म्हणून सुपरिचित असणाऱ्या आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस याही वर्षी विविध उपक्रमांनी साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष माधव पावडे यांच्या पुढाकारातून यावर्षी शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात दिनांक २ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजता महाराष्ट्रातील नामांकित कवींचे कवी संमेलन आयोजित करण्यात आलेले आहे. या कवी संमेलनाचे उद्घाटन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे . कवी संमेलनात छत्रपती संभाजी नगरचे नारायण पुरी , छत्रपती संभाजीनगरचे निलेश चव्हाण, इगतपुरीचे तुकाराम धांडे , अंबाजोगाईचे मुकुंद राजपंखे , अकोल्याचे किशोर बळी , माजलगावचे प्रभाकर साळेगावकर , जालनाच्या संजीवनी तडेगावकर , अहमदपूरचे राजेसाहेब कदम , परभणीचे केशव खटींग, नांदेडचे शिवाजी अंबुलगेकर , श्रीनिवास मस्के, शंकर राठोड , रोहिणी पांडे आणि मनोहर बसवंते हे कवी आपल्या कसदार कविता सादर करणार आहेत . भर पावसाळ्यात श्रावण मासात आता कवींच्या काव्यांच्या धारा नांदेडकरांना चिंब करणार आहेत.

# महापालिकेत प्रधानमंत्री आवास योजनेत भ्रष्टाचाराचा निवास

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३० जुलै -**



नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या सल्लागार संस्थांच्या निवडीत व देयक अदा करण्यात प्रचंड भ्रष्टाचार आणि अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप भारतीय जनता पार्टीचे महानगर सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांनी केला आहे. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



या निवेदनात गायकवाड यांनी म्हटले आहे की, महानगरपालिकेने पंतप्रधान आवास योजनेच्या आराखडा व इतर कामासाठी दि. ४ नोव्हेंबर २०१७ रोजी निविदा प्रसिद्ध केल्या होत्या. त्यासाठी चार जणांनी निविदा भरल्या होत्या, परंतु यातील तब्बल तीन निविदा अपात्र ठरवून अकोला येथील नवनिर्माण महिला बहुउद्देशीय संस्था या एकमेव एजन्सीला पात्र ठरवून दोन वर्षाच्या मुदतीसाठी काम मंजूर करण्याची शिफारस प्रशासनाने सर्वसाधारण सभेकडे केली.

सर्वसाधारण सभेने संस्थेला दोन वर्षासाठी प्रकल्पाच्या दरावर संस्थेला शुल्क निश्चित केले होते. परंतु प्रशासन व स्थायी समितीने संगणमत करून मार्च २०२० ते मे २०२० या दरम्यान कामाची मुदत संपल्यानंतर नव्याने निविदा न करता चक्क योजना संपेपर्यंत याच ठेकेदाराला कामाची मुदतवाढ दिली. इतकेच नव्हे, प्रकल्पाच्या दराऐवजी घरकुलाच्या प्रत्यक्ष किमतीवर शुल्क निश्चित करून व सल्लागार शुल्कात दरवाढ करताना त्यात पूर्वलक्षी प्रभावाने अशी दुरुस्ती करून ठेकेदाराला कोट्यावधी रुपयांच्या रक्कमेचा ज़्यादा लाभ मिळवून दिला.

शासन नियमानुसार सल्लागार संस्थेच्या कामासाठी पुरेशी स्पर्धा निर्माण होऊन शासकीय निकषाप्रमाणे दर निश्चित करणे आवश्यक होते. परंतु विसंगत शासन निर्णयाचा आधार घेऊन स्वतःची स्पर्धा स्वतःसोबत करून या ठेकेदाराला प्रधानमंत्री आवास योजनेच्या सल्लागाराचे काम देण्यात आले आणि पुढे शासकीय मंजूर किमतीऐवजी घरकुलाच्या प्रत्यक्ष बांधकामाच्या किमतीवर शुल्क अदा करण्याचा निर्णय घेऊन महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी शासनाचे आणि महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान केले आहे.

अकोला येथील या सल्लागार संस्थेला कामाची मुदतवाढ व ज्यादा रक्कम अदा करण्याची प्रशासनाची कृती शासन निर्णय, नियम, निर्देशाचे उल्लंघन करणारी व महानगरपालिकेसाठी आर्थिक नुकसानीची असल्याने या प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करण्याची मागणी साहेबराव गायकवाड यांनी आपल्या निवेदनात केली आहे. या निवेदनाची प्रत नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना देण्यात आली आहे.

**स्थायी समितीकडून विशेष अधिकाराचा वापर!**

स्थायी समितीचा निर्णय आर्थिक हिताच्या विरोधात असतानाही तो शासनाकडे विखंडित करण्यासाठी न पाठवता महानगरपालिकेच्या प्रशासकीय स्थायी समितीने विशेष अधिकाराचा वापर करून या ठेकेदाराला पावणे पाच कोटी रुपयांची खिरापत मागच्या वर्षी वाटप केल्याचा आरोप साहेबराव गायकवाड यांनी केला आहे.

# आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दादा,मामा-मामींची बत्ती गुल !

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.३० जुलै -**

तालुक्यात आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षापेक्षा भावी दादा,भाऊ,मामा-मामीने जि.प.सर्कल मध्ये प्रदक्षिणाच्या फेऱ्यात गुंतले आहेत . स्थानिक गावभेटीच्या घडामोडींना वेग आला आहे. पण माळाकोळी सर्कलमध्ये संजिवनी शासकीय कंन्ट्रक्शनचे गुत्तेदार नारायण जाधव यांच्या नावाची मोठ्या प्रमाणावर चर्चा चालू आहे. मीच उमेदवार म्हणून विविध पक्षांचे कार्यकर्ते व इच्छुक उमेदवार सध्या वधु विना वरच बाशिंग बांधून आपापल्या समर्थकांशी, मतदारांशी व वरिष्ठ नेत्यांशी सतत संपर्क साधत आसल्याचे दिसुन येत आहे.

लोहा तालुक्यात ६ सर्कल १२ पंचयत समिती गण आहेत. पण माळाकोळी गट मागील काळातील आरक्षणानुसार सर्वसाधारण गटासाठी आसल्याने विशेष सर्वसाधारण गटात येणारे भावी मामा, मामी, दादा, भाऊ, काका, बॉस अशा टोपणनावाने ओळखल्या जाणाऱ्या भावी इच्छुकांची संख्या मोठी असल्याचे मतदार संघाच्या पटलावर बघायला मिळत आहे. काही भावी उमेदवार टोपण नावांखाली आपला मागील कार्याचा परिपाठ सांगुन ३६५ दिवस वर्तमानकाळात सक्रीय कामाची आकाशवाणी करुन पुढील भविष्यवाणी मतदारांच्या बैठकीत सांगीतली जाते आहे. विशेषतःदादा ,भाऊ,बॅस,काका,मामा आणि मामी या नावाने मतदार संघात भावी उमेदवार भुमरा करीत आहेत यांचे प्रयत्न सध्या तालुक्यात चर्चेचा विषय ठरत आहेत.

दादा,मामी,मामा ,भाऊ,बॉस,काका हे भावी उमेदवार पक्षांतील नेत्यांच्या गाठीभेटी घेऊन पाठिंब्याच प्रयत्न करत आहेत .काही ठिकाणी ते अपक्ष म्हणून तयारी करत आहेत तर काही ठिकाणी त्यांच्या नातेवाईकांनाही उमेदवारी मिळवून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र जिल्हा परिषद व पंचायत समितीसारख्या व्यापक आणि विकासाभिमुख संस्थांमध्ये मतदारांचा निर्णय भावनिक नसून विकासकामे करणारा अडी-अडचणील धाऊन येणारा व लोकाभिमुख व्यक्तीला पसंती दिली जाते पण प्रदर्शन करुन बढाया मारणाऱ्या उमेदवाराचे फक्त रामायण ऐकले जाते.भावी उमेदवाराच्या भूमिकांचे आकलन व पारदर्शकता यावर जनता आधारित असते.नारायण जाधव मित भाषी ,व मनमिळावू स्वभावामुळे ते या परिसरात परिचित आहेत.स्थानिक परिसरातील रहिवासी आसल्याने त्यांचा या परिसरात चांगला,दांडगा संपर्क आहे.त्यांचा वाडी तांड्यावर मोठा वर्ग आहे.याच कारणाने सामान्य जनतेत सर्वसामान्य म्हणुन वावरात या गुणामुळे यांच्या नावाची चर्चा ऐकायला मिळत आहे.मतदार संघांत एक प्रश्न निर्माण झाला आहे केवळ नातेसंबंध, घराणे किंवा टोपणनावावर दादा,भाऊ,बॅस मामा-मामी निवडून येतील का? मतदारसंघातील विकास, जनतेची विश्वासार्हता व जनतेत जन संपर्क हे मोठे भांडवल आहे यावरच उमेदवाराची कार्यक्षमता पाहून मतदार मतदान करतील अशी जनतेत भावना असते.

एकूणच निवडणुकीत कुटुंब राजकारणा विरुद्ध, कामकाज कौशल्य लोकाभिमुख कार्यकर्ता असा संघर्ष दिसून येण्याची शक्यता आहे. त्यामुळे,दादा , भाऊ, बॅसमामा-मामी निवडून येतील की मतदार त्यांच्यावर ‘नोटा चा प्रयोग’ करतील, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.